



सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ८५ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ बुधवार दि. २३ एप्रिल २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६


## पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांचा फोटो समोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३जम्मू काश्मीर**

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम भागात मंगळवारी (२२ एप्रिल) दुपारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये पुन्हा एकदा तणाव निर्माण झाला आहे. केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरमध्ये हाय अलर्ट जारी केला आहे. गेल्या काही महिन्यांपासून काश्मीरमधील परिस्थिती पूर्ववत झाल्याचा दावा सातत्याने केंद्र सरकार व स्थानिक प्रशासनाकडून केला जात होता. मात्र, हा दावा फोल ठरला आहे. दरम्यान, काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यामागील संशयित दहशतवाद्यांचे छायाचित्र आणि रेखाचित्र सुरक्षा यंत्रणांनी जारी केले



आहेत. फोटोत असलेल्या चौघांपैकी तीन दहशतवाद्यांची ओळख पटली असून आसिफ फुजी, सुलेमान शाह आणि अबू तल्हा अशी त्यांची नावे आहेत. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

पहलगाम येथील बैसरन कुरणात पर्यटकांवर गोळीबार करण्यात आला. दहशतवादी गट लष्कर ए तैयबाची शाखा असलेल्या दि रेझिस्टन्स फ्रंटचे हे सदस्य असल्याचं म्हटलं जातंय. दरीच्या सभोवतालच्या घनदाट पाइन जंगलातून कुर्ता पायजमा घातलेले किमान ५ ते ६ दहशतवादी बैरसन कुराणात आले. त्यांनी एके ४७ ने गोळीबार केला. गुप्तचर संस्थांनी या हत्याकांडाचा सूत्रधार सैफुल्लाह कसुरी उर्फ खालिदचीही ओळख पटवली आहे. तो लष्कर-ए-तोयबाचा एक प्रमुख कमांडर होता. जंगलाचा फायदा घेऊन पळून जाणाऱ्या दहशतवाद्यांना शोधण्यासाठी सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात दहशतवादविरोधी मोहीम सुरू केली आहे आणि हेलिकॉप्टर तैनात केले आहेत.

**हल्लेखोरांची दुचाकी पोलिसांच्या ताब्यात**

भारताची गुप्तचर यंत्रणा देखील अलर्टवर असून ते या दहशतवाद्यांची माहिती गोळा करत आहेत. पोलिसांनी घटनास्थळावरून नंबर प्लेट नसलेली एक संशयास्पद दुचाकी जप्त केली आहे. दहशतवादी याच दुचाकीवरून बैसरन येथे आले असावेत असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## पर्यटकांना घोड्यावरून नेण्याचे काम करणारा आदिल

## ‘दहशतवाद्यांशी एकटा भिडला, बंदूक हिसकावली पण.....

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३पहेलगाम**

जम्मू-काश्मीरच्या अतिशय शांत आणि रम्य अशा पहलगाममध्ये मंगळवारी भीषण असा दहशतवादी हल्ला झाला. दहशतवाद्यांनी निष्पाप पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून वेचून मारले. अनेक राज्यातील २६ लोकांचा या हल्ल्यात जीव गेला. यामध्ये स्थानिक नागरिक सय्यद आदिल हुसैन शाह याचाही समावेश होता. पहलगामच्या बेस कॅम्पवरून पर्यटकांना घोड्यावरून बैसरन पर्वत रांगामधील पॉईंट दाखविण्याचे काम तो करत होता. जेव्हा दहशतवाद्यांनी हल्ला केला, तेव्हा पर्यटकांना वाचविण्यासाठी तो थेट दहशतवाद्यांशी भिडला, मात्र यात त्याला जीव गमवावा



लागला.

आदिल हुसैनच्या मृत्यूमुळे त्याच्या कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे. पर्यटकांना घोड्यावरून नेण्याचे काम करणारा आदिल त्याच्या घरातील एकमेव कमावता व्यक्ती होता, असे त्याच्या कुटुंबियांनी सांगितले. आदिलचे वडील सय्यद हैदर शाह यांनी एएनआयशी बोलताना सांगितले की, माझा मुलगा मंगळवारी पर्यटकांना घेऊन वर गेला होता. दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास हल्ला झाल्याची माहिती आम्हाला मिळाली. आम्ही तातडीने मुलाला फोन लावला, तर त्याचा फोन स्विच ऑफ येत होता. त्यानंतर ४ वाजून ४० मिनिटांनी त्याचा फोन सुरू झाला. पण समोरून कुणीही उत्तर देत नव्हते. आम्ही पोलीस ठाण्यात गेलो आणि माहिती घेतली असता तो जखमी झाल्याचे कळले.

मृत आदिलच्या आईने रडत रडत आपली व्यथा मांडली. त्या म्हणाल्या, तो आमचा एकुलता एक आधार होता. घोडे भाड्याने देऊन तो कुटुंबासाठी पैसे कमवत होता. आता आमच्या उदरनिर्वाहाचे काय. त्याच्याशिवाय आमचे भविष्य काय? याची कल्पनाही करवत नाही.

## सात दिवसांपूर्वी झालं होतं लग्न, दहशतवादी हल्ल्यात २६ वर्षीय नौदल अधिकाऱ्याचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३पहेलगाम**

नौदलात लेफ्टनंट म्हणून कार्यरत असलेल्या विनय नरवाल या २६ वर्षीय अधिकाऱ्याचा पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला आहे. विनय नरवाल हे मुळचे हरियाणाचे होते. जम्मू काश्मीरच्या पहलगाम मध्ये ते मारले गेले. सात दिवसांपूर्वीच त्यांचं लग्न झालं होतं. छोट्याश्या सुट्टीसाठी विनय नरवाल काश्मीरला पोहचले होते.

**विनय नरवाल यांचा मृत्यू**

सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांनी २६ वर्षीय विनय नरवाल यांचा दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे. कोची या ठिकाणी त्यांचं



पोस्टिंग होतं. १६ एप्रिलला त्यांचं लग्न झालं. त्यानंतर १९ एप्रिलला रिसेप्शन पार पडलं. यानंतर विनय नरवाल सुट्टीवर आले होते. काश्मीरमधल्या पहलगाम या ठिकाणी मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. दोन वर्षांपूर्वी विनय नरवाल यांनी नौदलात नोकरी स्वीकारली. त्यांचं पोस्टिंग कोची मध्ये होतं. विनय यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबाला धक्का बसला आहे. त्यांचे कुटुंबीय अत्यंत दुःखात आहेत. त्यांच्या इतर नातेवाईकांनी, मित्रांनी तसंच शेजाऱ्यांनी घडलेल्या घटनेबाबत दुःख व्यक्त केलं आहे.

मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातले ६ जण मारले गेले आहेत. पुणे, डोंबिवली, पनवेल या ठिकाणी वास्तव्य करणारे हे पर्यटक होते. दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. त्यांना जशास तसं उत्तर दिलं जाईल अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिली आहे. दरम्यान २६ वर्षीय विनय नरवाल यांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## अमरावतीचे ३६ पर्यटक सुखरूप, गोळीबार सुरू होण्याच्या काही मिनिटांपूर्वीच निघाले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

काश्मीरमध्ये गेल्या सहा वर्षांतील सर्वात मोठा दहशतवादी हल्ला झाला आहे. दहशतवाद्यांनी यावेळी पर्यटकांना लक्ष्य केले आहे. पहलगाम मधील ‘छोटे स्वित्झर्लंड’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन भागात मंगळवारी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. यावेळी पहलगामच्या परिसरात अमरावतीचे सुमारे ३६ पर्यटक वेगवेगळ्या गटांमध्ये होते. हे सर्व पर्यटक सुखरूप आहेत.

अमरावतीतील मंगला बोडके, छाया देशमुख, चंदा लांडे, सारिका चौधी आणि निता उमेकर यांच्या कुटुंबातील सदस्य जम्मू काश्मीरला पर्यटनासाठी गेले होते. मंगळवारी ते पहलगाम येथे फिरण्यासाठी गेले. तेथे ते हसत खेळत पहलगामच्या वातावरणात हरवले होते. त्यांनी तेथे व्हिडिओ, फोटो काढले. या कुटुंबियांमध्ये सर्वच वयोगटातील लोकांचा समावेश होता. काही वेळानंतर ते तिथून निघाले आणि काही क्षणातच तेथे दहशतवादी हल्ला झाला. तोपर्यंत ते सुखरुप स्थळी




पोहचले होते. सध्या ते श्रीनगरमध्ये अडकलेले आहेत.महाराष्ट्र शासनाने या पर्यटकांना मदत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. काही पर्यटक श्रीनगर आणि पहलगाम येथील हॉटेलमध्ये थांबून आहेत. हे पर्यटक कालच्या घटनेने हादरून गेले आहेत. अनेक पर्यटकांनी आपल्याला रात्रभर झोप देखील लागली नाही, असे सांगितले.

आंचलविहार, इश्वर कॉलनी परिसरातील २२ पर्यटक देखील काश्मिरला गेले होते. ते सर्व सुखरूप असून श्रीनगरहून दिल्ली येथे विमानाने रवाना झाले आहे. जिल्ह्यातील करजगाव येथूनही काही पर्यटक पहलगाम येथे गेले होते, तेही सुखरूप असल्याची माहिती मिळाली आहे. हे पर्यटक आता घरी परतण्याच्या प्रयत्नात आहेत.

विविध ट्रॅव्हल कंपन्यांद्वारे काश्मीरमध्ये गेलेले सर्व पर्यटक सुरक्षित असून, त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहेत. आम्ही स्थानिक सहल संयोजकांच्या संपर्कात आहोत. पर्यटकांच्या सुरक्षेची काळजी घेतली जाते आहे, अशी माहिती विविध ट्रॅव्हल कंपनी संचालकांनी दिली आहे.

सहलींचा हंगाम असल्याने जिल्ह्यातून सुमारे ४० पर्यटक सध्या जम्मू काश्मीरमध्ये पर्यटनास गेले आहेत. पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्याची माहिती जाहीर झाल्यानंतर सर्वच पर्यटन कंपन्यांना धक्का बसला.

## पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालेल्या पर्यटकांचे पार्थिव आज महाराष्ट्रात आणणार, उपमुख्यमंत्री शिंदेंची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई**

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये मंगळवारी (२२ एप्रिल) दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या हल्ल्यात एकूण २६ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. तसेच एका लहान मुलासह २० जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये महाराष्ट्रातील सहा जणांचा समावेश आहे. यात डोंबिवलीमधील तिघे, पुण्यातील दोन व पनवेलमधील एका रहिवाशाचा समावेश आहे. दरम्यान, या हल्ल्यात ठार झालेल्या महाराष्ट्रातील



पर्यटकांचे पार्थिव आज मुंबई व पुण्याला आणले जातील. राज्य सरकारने तशी व्यवस्था केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याबाबतची माहिती दिली आहे.

एकनाथ शिंदे यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात राज्यातील ६ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. यातील मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांचे पार्थिव आणि नातेवाईकांना पुन्हा राज्यात आणण्याची प्रक्रिया सरकारच्या वतीने सुरू झाली आहे. मी स्वतः यासंदर्भात बारकाईने आढावा घेत असून सर्वांशी समन्वय साधून आहे. श्रीनगर येथे या पर्यटकांचे पार्थिव आणि त्यांच्या नातेवाईकांना विमानात बसवून देण्यासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांचे स्वीय सहाय्यक अभिजित दरेकर आणि त्यांची टीम काल रात्रीच श्रीनगरमध्ये पोहोचली आहे. तर, मुंबईत पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम हे समन्वयासाठी उपस्थित राहणार आहेत.

## पहलगाम हल्ला अतिशय चीड आणणारा : मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला संताप; महाराष्ट्राचे सर्व पर्यटक सुरक्षित असल्याचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई /अमरावती**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहलगाम हल्ल्यावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. हा अतिशय चीड आणणारा हल्ला आहे. त्यात निष्पाप नागरिकांची त्यांचा धर्म विचारून हत्या करण्यात आली. हा देशात व समाजात उभी फूट पाडण्याचा प्रयत्न असून, हल्लेखोरांवर अतिशय कडक व टोकाची कारवाई होईल याविषयी माझ्या मनात कोणतीही शंका नाही, असे ते म्हणालेत. महाराष्ट्रातीय सर्व पर्यटक सुरक्षित असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

देवेंद्र फडणवीस येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, पहलगाम हल्ल्यात मृत्यू झालेल्या महाराष्ट्रातील ६ पर्यटकांचे मृतदेह आज राज्यात आणले जातील. मुंबईत आशिष शेलार व मंगलप्रभात लोढा हे दोन मंत्री सर्व व्यवस्था पाहत आहेत. पुण्यात केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ या प्रकरणात लक्ष घालत आहेत. तेथील विमानतळावर मंत्री माधुरी मिसाळ सर्व व्यवस्था पाहत आहेत. याशिवाय आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन स्वतः श्रीनगरला पोहोचत आहेत.

### अमरावती मधील लोकांसाठी हेल्पलाईन क्रमांक जारी




ते तिथे जाऊन तिथे अडकलेल्या पर्यटकांशी समन्वय साधतील.

याशिवाय ज्या पर्यटकांनी सोशल मीडिया किंवा मेसेजद्वारे प्रशासनाशी संपर्क साधला आहे, त्या सर्वांना परत आणण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आलेत. काही लोकांना इंडिगोच्या विशेष विमानाने आज परत आणले जाणार आहे. आज दिवसभर आढावा घेतल्यानंतर उद्या एखादे विशेष विमान उपलब्ध करून देण्याच्या मुद्यावर मी मुरलीधर मोहोळ यांना विनंती केली आहे. यासंबंधी तिकिटांची व्यवस्था सरकार करेल.

**पहलगाममधील पर्यटकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन सुरू**

काश्मीरमधील पहलगाम येथील झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर जिल्ह्यातील पर्यटक अडकले असण्याची शक्यता आहे. या परिस्थितीतील नागरिकांच्या मदतीसाठी श्रीनगर येथे विशेष हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे.

**हेल्पलाईन क्रमांक हा दूरध्वनी**

०१९४-२४६३६५१, २४५७५४३, २४८३६५१ असून व्हॉटसप क्रमांक : ७७८०८०५१४४, ७७८०९३८३९७, ७००६०५८६२३ आहे. जिल्ह्यातील नागरिक पहलगाममध्ये अडकले असल्यास त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा किंवा माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, दूरध्वनी क्रमांक: ०७२१-२६६२०२५, आपत्कालीन संपर्कासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर संपर्क क्रमांक : ९४२१७४७७७७, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर, संपर्क क्रमांक : ९५४५४६३४५०, ९०४९३३१९९६ यावर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

## संपादकीय ......

# हिंदूंवरील हल्ले थांबवा

बांगला देशात झालेल्या हिंसक उठावानंतर पंतप्रधान शेख हसीना यांना त्या देशातून पलायन करावे लागले. ५ ऑगस्ट २०२४ रोजी त्या तात्पुरत्या आश्रयासाठी भारतात आल्या. त्या अद्यापही भारतातच असून, त्यांना आमच्या स्वाधीन करावे, अशी मागणी बांगला देशने भारताकडे केली आहे. त्या देशातील अराजक आजही कायम असून, हसीना यांची तेथे घरवापसी केल्यास, त्यांना जिवंत राहू दिले जाईल, याचीही खात्री नाही. बांगला देशात ठिकठिकाणी जाळपोळ आणि हिंसाचारासारख्या घटना अधूनमधून होतच असून, भावेशचंद्र रॉय या हिंदू नेत्याची नुकतीच हत्या करण्यात आली आहे. वासुदेवपूर येथील रहिवासी असलेले रॉय हे 'बांगलादेश पूजा उद्यापन परिषदे'च्या बिरल शाखेचे उपाध्यक्ष होते. स्थानिक हिंदू समुदायातील प्रतिष्ठित व्यक्ती, अशी त्यांची ओळख होती. दुचाकीवरून त्यांच्या घरी येऊन चार व्यक्तींनी त्यांचे अपहरण केले. बेशुद्ध होईपर्यंत मारहाण करण्यात आली. नंतर रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाला. या हत्येचा तीव्र निषेध भारत सरकारने केला असून, अल्पसंख्याकांच्या सुरक्षेची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. बांगला देश पूजा उद्यापन परिषद ही त्या देशात धार्मिक उत्सवांचे आयोजन करत असते.कोणत्याही देशात अल्पसंख्याकांना आपल्या धार्मिक प्रथा-परंपरांचे जतन करण्याचा अधिकार असतो. भारतात मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, पारसी, ज्यू अशा विभिन्न अल्पसंख्यधर्मीयांना मुक्तपणे सण-उत्सव साजरे करता येतात. अल्पसंख्याकांचे संरक्षण ही भारत सरकार प्राथमिक जबाबदारी मानते. बांगला देशात आज कोणतीही राजकीय व्यवस्था नसून, तेथे अनागोंदी माजली आहे. हिंदूंचा पद्धतशीरपणे छळ केला जात असून, हिंदू मंदिरांवरही हल्ले केले जात आहेत. परराष्ट्र खात्याने याच महिन्यात राज्यसभेत दिलेल्या माहितीनुसार, बांगला देशात अल्पसंख्याकांवरील हल्ल्याच्या २,४०० घटना गेल्या ८ महिन्यांत घडल्या. वास्तविक अनेक घटनांच्या संदर्भात कोणतेही गुन्हे नोंदवले जात नसून, जिहादी गटांना मोकळे रान दिले जात असावे, असा संशय येतो. गेल्या ४ एप्रिल रोजी बांगला देशच्या हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार प्रा. मोहम्मद युनूस यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत बँकॉक येथे बिमस्टेक शिखर परिषदेच्या निमित्ताने चर्चा झाली. त्यावेळी मोदी यांनी बांगला देशमधील हिंदूंवरील अत्याचार व हल्ले याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. हा देश सर्वांसाठी सारखाच आहे, कोणावरही अन्याय होऊ देणार नाही, असे आश्वासन युनूस यांनी तेथील ढाकेश्वरी मंदिराला भेट दिल्यानंतर दिले होते.बांगला देशात लोकसंख्येच्या ८ टक्के, म्हणजे एकूण १ कोटी ३१ लाख हिंदू आहेत. हसीना यांनी सत्ता सोडल्यानंतर हिंदू व अल्पसंख्याकांना लक्ष्य करण्यात येऊ लागले. मुळात आरक्षणाच्या मुद्द्यावरून बांगला देशात विद्यार्थ्यांनी बंड केले आणि याचा फायदा माजी पंतप्रधान बेगम झिया यांची बांगला देश नॅशनॅलिस्ट पार्टी तसेच जमाते इस्लामी या विरोधी पक्षांनी घेतला. त्या देशात पाकिस्तानी प्रवृत्तींनी प्रथमपासूनच मूळ धरले असून, त्यांचा हसीना यांच्या अवामी लीगला विरोध आहे. शेख मुजिबूर रहमान हे बांगला देशचे शिल्पकार होते आणि त्यांनी पूर्व पाकिस्तानमधील बंगाली अस्मितेला टोकदार स्वरूप दिले. त्यावेळी बांगला देशमुक्ती वाहिनीला तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पाठबळ दिले आणि त्यामधून बांगला देशची निर्मिती झाली; मात्र बांगला देशातील पाकिस्तानकडे कल असलेल्या जहाल प्रवृत्तींनी मुजिबूर यांची हत्या केली.

हसीना पंतप्रधान झाल्या तेव्हापासून भारत व बांगला देश यांचे संबंध अधिक सुधारले; पण दीर्घ सत्तेनंतर हसीना यांच्या विरोधात आंदोलने झाली आणि शेवटी त्यांना देशातून परागंदा व्हावे लागले; मात्र अवामी लीग आणि भारत सरकार यांचे जवळचे संबध असून, भारत हा बांगला देशच्या हितसंबंधांना नख लावत आहे, असा अपप्रचार हसीनाविरोधी पक्षांनी सुरू केला. मुजिबूर यांच्या पुतळ्यासह त्यांचे घरही उद्ध्वस्त करण्यात आले. मुजिबूर यांचे बांगला देशनिर्मितीचे श्रेयही नाकारण्यात येत आहे. एकूणच इतिहास बदलण्याचे काम तेथे सुरू आहे. ढाका येथील भारतीय संस्कृती केंद्र आणि अनेक मंदिरांची जाळपोळ करण्यात आली. चट्टोगाव येथील कुंडलीधाम आश्रमाचे दोन सदस्य तसेच इस्कॉनचे माजी पुजारी चिन्मय कृष्ण दास यांना अटक करण्यात आली. दास हे भगवान कृष्ण आणि भगवान जगन्नाथ यांच्या पूजेसाठी प्रसिद्ध असलेल्या धार्मिक केंद्राचे माजी प्रमुख तसेच बांगला देश सनातन जागरण मंचचे प्रवक्ते आहेत. हिंदू मंदिरे आणि सुफी दर्ग्यांवरील हल्ले वाढू लागले, तेव्हा त्या विरोधात दास यांनी मोर्चे काढले आणि प्रशासनाविरोधात भाषणे दिली.एका सभेत बांगला देशच्या राष्ट्रध्वजाच्या वर भगवा ध्वज फडकावण्यात आला, तेव्हा हा राष्ट्रध्वजाचा अवमान असल्याचा आरोप करत दास यांच्यावर कारवाई करण्यात आली. गेल्या काही महिन्यांत बांगला देशात १७० हिंदू कुटुंबांवरही हल्ले करण्यात आले. हिंदूंची अनेक दुकाने लुटली गेली. काही ठिकाणी मंदिरांचे पूजा मंडप, तर काही ठिकाणी मूर्तींची विटंबनाही केली गेली. जमावाच्या हिंसाचारात २३ हिंदू मारले गेले. बांगला देशातील हिंदूंवरील अत्याचार हे घृणास्पद आहेत, अशी प्रतिक्रिया सुरुवातीला युनूस यांनी व्यक्त केली होती. एवढेच नव्हे, तर हसीनाविरोधी आंदोलनाचे नेतृत्व करणार्या विद्यार्थ्यांना संबोधित करताना अल्पसंख्याक या देशाचे नागरिक नाहीत का, असा सवालही युनूस यांनी केला होता. हिंदू, ख्रिश्चन आणि बौद्ध कुटुंबांना सुरक्षितपणे जगू द्या, असेही ते म्हणाले होते. गेल्यावर्षी ढाका येथील शहाबाग चौकात आम्हाला सुरक्षा द्या, अशी मागणी करून हिंदू लोक एकत्र जमले होते. युनूस हे नोबेल विजेते अर्थशास्त्रज्ञ आहेत; पण राजवटीची सर्व सूत्रे हाती घेतल्यानंतर केवळ पोकळ आश्वासने देण्यापलीकडे त्यांनी काहीही केलेले नाही. वास्तविक भारतात असंख्य बांगला देशी घुसखोर असले, तरी त्यांच्यावर येथे हल्ले केले जात नाहीत. या सर्व पार्श्वभूमीवर, बांगला देशातील विद्यमान सरकार तेथील हिंदूंवरील हल्ले रोखण्यात अपयशी ठरले आहे. हिंदूंचा छळ न थांबल्यास मोदी सरकाने त्या देशाबाबत कडक पावले उचलली पाहिजेत.




# उन्हाळ्यात अंडी खाणे धोकादायक? तज्ज्ञ काय सांगतात

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

उन्हाळा येताच आणि पंखे आणि कूलर चालू होतात. यासोबतच लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयी देखील बदलू लागतात. या ऋतूमध्ये थंड पदार्थांना प्राधान्य दिले जाते अन् काही गोष्टी उष्ण स्वरूपाच्या असल्याने टाळल्या जातात. या ऋतूत बरेच लोक अंडी खाण्यापासून दूर राहतात. उन्हाळ्यात अंडी खाल्ल्याने शरीरात उष्णता वाढते, असं सांगितलं जातं. त्यामुळे अनेकजण उन्हाळ्यात अंडी खाणं टाळतात. पण काय खरंच उन्हाळ्यात अंडी खाणे आरोग्यासाठ हानिकारक आहे? हे आपण जाणून घेऊ या.

**अंडी खाण्याचे फायदे**

१. अंड्यांमध्ये उच्च दर्जाचे प्रथिने असतात, ते शरीराच्या वाढीसाठी आणि स्नायूंच्या वाढीसाठी आवश्यक असते.

२. अंड्यांमध्ये व्हिटॅमिन बी १२, व्हिटॅमिन डी, फॉलिक ॲसिड आणि सेलेनियम सारखे आवश्यक पोषक घटक असतात, ते शरीराला योग्यरित्या कार्य करण्यास मदत करतात.

३. अंड्यांमध्ये ल्युटीन आणि झेक्सॅन्थिन नावाचे अँटीऑक्सिडंट्स असतात, ते डोळ्यांचे नुकसान होण्यापासून संरक्षण करतात आणि डोळ्यांचे आरोग्य सुधारतात.

४. अंडी खाल्ल्याने पोट लवकर भरते, ज्यामुळे जास्त खाणे टाळता येते, ते वजन कमी करण्यास मदत करू शकते.

५. अंड्यांमध्ये कोलेस्टेरॉल असते, परंतु संशोधनातून असे दिसून आले आहे की, ते बहुतेक लोकांना हृदयरोगाचे कारण बनत नाही. ते मर्यादित प्रमाणात खाणे सुरक्षित आहे. ६. अंड्यांमध्ये व्हिटॅमिन डी असते, जे हाडे मजबूत करण्यास मदत करते.

७. अंड्यामध्ये कोलीन नावाचा घटक असतो, तो मेंदू सुधारतो आणि स्मरणशक्ती वाढवतो.

**अंडी खाल्ल्याने उष्णता वाढते?** तज्ज्ञ सांगतात



की, अंडी हे उष्ण अन्न आहे. हे खाल्ल्यानंतर शरीरात थोडी उष्णता जाणवू शकते. पण याचा अर्थ असा नाही की, उन्हाळ्यात अंडी खाणे हानिकारक आहे. अंडी हे प्रथिने, व्हिटॅमिन बी १२, लोह आणि निरोगी चरबीचा उत्कृष्ट स्रोत आहे. जर तुम्ही ते मर्यादित प्रमाणात खाल्ले, तर उन्हाळ्यातही ते फायदेशीर ठरते.

**उन्हाळ्यात अंडी कशी खावीत?**

उकडलेले किंवा मऊ उकडलेले अंडे खा, तेलकट ऑम्लेट किंवा अंडी करी टाळा.

दिवसाच्या थंड वेळी खा, जसे की नाश्ता, दुपारच्या कडक उन्हात नाही. शरीराचे तापमान संतुलित राहावे म्हणून भरपूर पाणी प्या. अंडी लवकर खराब होऊ नयेत म्हणून ती रेफ्रिजरेटरमध्ये ठेवा.

**उन्हाळ्यात अंडी कोणी खाऊ नयेत?**

१. ज्या लोकांना वारंवार उष्णता जाणवते किंवा शरीरात पित्त समस्या असतात. २. डिहायड्रेशन किंवा असिडिटीची समस्या आहे. ३. मुलांना आणि वृद्धांना मर्यादित प्रमाणातच द्यावे.

# शेतकऱ्यांनो शेतात गाळ भराल तर होतील हे चार फायदे; जाणून घ्या सविस्तर

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

गाळ हा मातीचा एक महत्त्वाचा घटक आहे, ज्याचा कृषी उत्पादकतेवर महत्त्वपूर्ण परिणाम होतो. हा गाळ खडक आणि खनिजांच्या लहान कणांनी बनलेला असतो.गाळात पोषकद्रव्ये आणि चिकणमाती माती चांगल्या प्रमाणात असते, ज्यामुळे शेतातील मातीचा पोत सुधारतो आणि पिकांच्या वाढीस चालना मिळते. शेतजमिनींवर गाळाचा वापर केल्यास शेतकऱ्यांना पुढील प्रकारे फायदा होऊ शकतो.

**१) गाळ हा पोषक तत्वांचा नैसर्गिक स्रोत आहे.**

गाळ सेंद्रिय संयुगे, नायट्रोजन, फॉस्फरस आणि वनस्पतींच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या इतर पोषक द्रव्यांनी समृद्ध आहे. जेव्हा गाळ शेतात पसरवला जातो, तेव्हा तो माती समृद्ध करतो आणि पिकांना पोषक द्रव्यांचा नैसर्गिक स्रोत प्रदान करतो. यामुळे महाग आणि पर्यावरणासाठी हानिकारक अशा रासायनिक खतांची आवश्यकता कमी होते.

**२) गाळ मातीचा पोत सुधारतो.**

गाळाचे कण बारीक आणि गुळगुळीत असतात, ज्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो त्यामुळे मुळांना पाणी आणि पोषकद्रव्ये शोषणे सोपे होते. रोपांची वाढ चांगली होते आणि जास्त उत्पादन मिळते. गाळ, मातीचे कण एकत्र बांधून ठेवत असल्याने मातीची धूप रोखण्यास मदत होते.

**३) गाळ जमिनीची सुपिकता वाढवतो.**

गाळ हा हलक्या आणि मध्यम दर्जाच्या मातीची सुपीकता वाढवतो. मातीमध्ये पोषक द्रव्ये आणि सेंद्रिय पदार्थ उपलब्ध झाल्याने वनस्पतीच्या निरोगी वाढीस मदत होते. गाळामुळे मातीची रचना सुधारण्यास मदत होते, ज्यामुळे मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. याचा अर्थ असा की पिकांना कमी पाणी लागून शेतकऱ्यांचे सिंचनावरील पैसे वाचू शकतात.

**४) गाळ बिनशेती जमीन लागवडीखाली आणू शकतो.**

गाळाच्या वापराने बिनशेती असलेली जमीनही लागवडीखाली आणता येते. गाळ कठीण आणि घट्ट झालेली माती फोडण्यास आणि पिकांच्या वाढीसाठी योग्य वातावरण तयार करण्यास मदत करू शकतो. विस्तारीत कृषी उत्पादनासाठी आणि जमिनीची कमतरता असलेल्या प्रभागांमध्ये अन्न सुरक्षा वाढविण्यासाठी गाळाचा उपयोग होऊ शकतो.







शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने
देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# पहलगाम हल्ल्यानंतर मोदींनी सौदी दौरा अर्धवट सोडला

## भारतात तातडीने परतले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३नवी दिल्ली** काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट थांबवून आज सकाळी दिल्लीत पोहोचले. विमानतळावरच मोदींनी संक्षिप्त बैठक घेतली. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर, परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री आणि इतर अधिकाऱ्यांकडून त्यांनी हल्ल्याची माहिती घेतली. दरम्यान, मोदींनी आज सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीची देखील बैठक बोलावली आहे.सौदीहून परतलेल्या पंतप्रधान मोदींनी विमानतळावरच बैठक घेतली. विमानतळावर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांच्याशी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर परिस्थितीवर चर्चा केली. दक्षिण काश्मीरमधील पहलगाम येथील एका प्रमुख पर्यटन स्थळावर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात किमान ३० जण ठार झाले आणि अनेक जण जखमी झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. मृतांमध्ये युएई आणि नेपाळमधील दोन परदेशी आणि दोन स्थानिक नागरिकांचा समावेश आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीची बोलावली बैठक**

मंगळवारी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर



अंदाधुंद गोळीबार केल्याने किमान २६ जणांचा मृत्यू झाला. लष्कराच्या गणवेशात आलेल्या दहशतवाद्यांनी पहलगामच्या बैसरन व्हॅलीमध्ये पर्यटकांना त्यांच्या धर्माबद्दल विचारले, त्यांची ओळखपत्रे तपासली आणि नंतर ते हिंदू असल्याचे सांगत त्यांना गोळ्या घालून ठार मारले. २६ मृतांपैकी बहुतेक पर्यटक आहेत, तर दोन परदेशी आणि दोन स्थानिक नागरिक आहेत. या हल्ल्यात सुमारे २० जण जखमी झाले आहेत. तथापि, सरकारने आतापर्यंत फक्त १६ मृत्यूंची पुष्टी केली आहे. त्याच वेळी, सुरक्षा यंत्रणांनी काल रात्री उशिरा काही संशयितांना ताब्यात घेतले आहे. या हल्ल्याच्या निषेधार्थ आज जम्मू बंद आहे. आज दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीची बैठक होणार आहे. त्यांनी गृहमंत्री अमित शहा यांनाही तत्काळ आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत.

# ७० गावांना १२ टँकरने पाणीपुरवठा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३** अमरावती : एप्रिलमध्ये तापमान ४४ अंशांवर गेल्याने जलस्रोतांना कोरड पडली व पाणीटंचाईची तीव्रता वाढली आहे. उंचावरील दुर्गम भाग असलेल्या मेळघाटात दाहकता वाढली आहे. सद्य:स्थितीत तहानलेल्या १२ गावांत टँकरने पाणीपुरवठा होत आहे. शिवाय ५७ गावांमध्ये २३ विंधनविहिरी व ४४ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आलेले आहे. मार्चअखेर जिल्ह्याचा पारा ४१ अंशांवर व एप्रिल महिन्यात ४३ अंशांचे पार गेला. त्यामुळे भूजल पातळीत कमी आली व पाण्याचे उद्भव कोरडे पडायला लागले व पाणीटंचाईची चटके जिल्ह्यात जाणवायला लागले आहे. जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार चिखलदरा तालुक्यातील कोरडा, चुनखडी, आकी, खडीमल, मोथा, लवादा व तारुबांदा धारणी तालुक्यात कढाव, दाबका, रणीगाव, कंजोली, धारणमहू, दिदब्बा व बारू, अमरावती तालुक्यात कस्तुरा, मोगरा, अमडापूर व भानखेडा, मोर्शी तालुक्यात ब्राह्मणवाडा, पिंपळखुटा लहान, गोराळा, शिरजगाव व कोळविहीर, भातकुली तालुक्यात दाढीपेढी, चांदूर रेल्वे तालुक्यात सावंगी, मग्रापूर, टेंभुर्णी, निमला व पाथरगाव, तिवसा तालुक्यात अमदाबाद, फत्तेपूर, जावरा, वठोडा खुर्द, मार्डी व धोत्रा तालुक्यात अधिग्रहणातील विंधनविहीर व



खासगी विहिरीद्वारे सद्यस्थितीत पाणीपुरवठा होत आहे.नांदगाव तालुक्यात वाढोणा रामनाथ, खानापूर, हिवरा बु., मंगरूळ चव्हाळा, पळसमंडळ, खेडपिंप्री, वेळी गणेशपूर, लेहगाव, कंझरा, वाटपूर, शिवरा, टाकळी गिलबा, धर्मापूर, राजना व काजना तसेच बोर्डा, विहिरींद्वारे पाणीपुरवठा होत असल्याचे सांगितले.

# मोर्शीत अवैध वाळू तस्करी करणारे नऊ ट्रक पकडले

## महसूल विभागाच्या पथकांची दबंग कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मोर्शी–**

ओव्हरलोड अवैधरीत्या गौणखनिज वाळूची तस्करी करणाऱ्या ९ ट्रक महसूल विभागाच्या पथकाने मौजे उमरखेड येथे ही कार्यवाही केली आहे. सोमवार २१ एप्रिल रोजी रात्री ११:३० वाजताच्या सुमारास महसूल विभागाच्या पथकाने ही कारवाई केली आहे. मध्य प्रदेशातून मोर्शी तालुक्यातील उमरखेड मार्गाने विना रायल्टी अवैधरीत्या गौणखनिज वाळू वाहतुक करणारे ९ ट्रक महसूल विभागाने जप्त करून मोर्शी पोलिस ठाण्यात जमा केले असून, सदर प्रकारणात दंडात्मक कारवाई सुरू केली आहे. महसूल विभागाच्या या धडक कारवाईमुळे अवैधरीत्या वाळू तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.मध्य प्रदेशातून



ओव्हरलोड ट्रक भरून अवैधरीत्या वाळूची तस्करी मोठ्या प्रमाणात सुरू आहे. ही बाब लक्षात घेताजिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनात सोमवारी रात्री ११:३० वाजताचे सुमारास रोहयो विभागाचे उपजिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वातील पथक, मोर्शीचे तहसीलदार, नायब तहसीलदार, तलाठी शिरखेड, पोलिस स्टेशन मोर्शी व बेनोडा यांनी अवैधरीत्या ओव्हरलोड वाळूने भरलेले ९ ट्रक मध्य प्रदेश येथून वरुड बेनोडा मोर्शी मार्गे जात असताना, मोर्शीपासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या उमरखेड येथे ट्रक क्र एमएच २७ डी टी ५१६६, एम एच २७बी एक्स ३६६३, एमएच २७ बीएक्स ६०६०, एम एच २७ डी टी ९४९८, एम एस २७डीएक्स ९४९९, एम एच २७डीटी ०८१७, एम एच २७ डी.टी ७८२२, एमएच २७ बीएक्स ५१११,एम एच २७ डीटी ४५५५ मध्ये जवळपास ६० ब्रास रेती भरलेले ट्रक पकडण्यात येऊन कार्यवाही करण्यात आली. वाहनातील रेतीचे अचूक मोजमाप करण्यासाठी उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग मोर्शी यांना पत्र देऊन पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २३ एप्रिल २०२५ शहर/ग्रामिण


# पहलगाम मध्ये तुमच्या ओळखीचे कुणी अडकले असेल तर 'या' तीन क्रमांकावर साधू शकता संपर्क




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३जम्मू काश्मीर –** जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याबाबत वेगवेगळी धक्कादायक माहिती समोर येत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्यात अंदाजे ३० जणांचा मृत्यू झाल्याचे बोलले जात आहे. तसेच अनेक जण जखमी झाले आहेत. मंगळवारी दुपारी दक्षिण काश्मीरमधील पहलगाममधील बैसरनच्या गवताळ प्रदेशात मोठ्या संख्येने पर्यटक उपस्थित होते. त्यावेळी सुमारे ३ वाजता अचानक गोळीबार झाला आवाज आला आणि सर्वत्र आरडाओरडा झाला. हल्ल्यानंतर, पर्यटकांना मदत आणि माहिती देण्यासाठी आपत्कालीन मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. पोलिसांशी संपर्क साधण्यासाठी ९५९६७७७६६९, ०१९३२२ २५८७० (९४१९०५१९४० व्हाट्सअप) हे हेल्पलाइन क्रमांक जारी करण्यात आले आहेत. सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. ते म्हणाले की, दोषींना सोडले जाणार नाही. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी श्रीनगरला पोहोचले आहेत. दहशतवाद्यांवर कडक कारवाई केली जाईल, असे त्यांनी म्हटले आहे.



### हिंदूंना कलमा पढण्यास भाग पाडलं...

आसावरी यांनी आजतकला सांगितले की, दहशतवादी स्थानिक पोलिसांच्या गणवेशात आले होते आणि त्यांनी मास्क घातले होते. त्यांनी फक्त पुरुषांना लक्ष्य केले आणि विशेषतः हिंदूंना कलमा म्हणण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला. ज्यांना वाचता येत नव्हते, त्यांना गोळ्या घालण्यात आल्या. माझ्या वडिलांना माझ्यासमोर तीन गोळ्या घालण्यात आल्या. माझ्या काकांनाही गोळ्या लागल्या. आम्ही तंबूच्या मागे लपलो होतो. स्थानिक लोकांनी दहशतवाद्यांना घाबरवण्याचा प्रयत्न केला, त्यांना पाहून आम्ही घाबरलो आणि आम्हीही कलमा पढायला लागलो आणि तेथून पळून गेलो. आम्ही घोड्यांवरून पळून कसाबसा जीव वाचवला.

# धामणगावच्या रजत पत्रे यूपीएससी उत्तीर्ण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ धा.रेल्वे–** यूपीएससी २०२३ मध्ये मुख्य परीक्षेत उत्तम गुण होते. त्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरलो. मुलाखतीच्या पूर्वी ओळख पत्रावर स्वत:चा फोटो चिकटवणे आवश्यक आहे, त्यामुळे मी माझा फोटो लावला, त्या फोटोत माझी दाढी, मिशी वाढली होती. दरम्यान मुलाखतीला गेलो, तज्ज्ञांच्या पॅनलसमोर माझी मुलाखत सुरू झाली. ज्या बाबीचा मी स्वप्नातही विचार केला नव्हता, असे त्यावेळी घडले आणि डोळ्यासमोर दिसणारे यश क्षणात नाहीसे झाले. कारण ओळख पत्रावर माझा दाढी, मिशी असलेला आणि पाच वर्षांपूर्वीचा फोटो होता. मात्र मुलाखतीला मी दाढी, मिशी काढून 'क्लिन शेव्ह' गेलो होतो. नेमकं माझ तेच चुकलं आणि ओळखपत्रावरील फोटो माझाच असूनही 'तो तू नव्हेच' असे समोरच्या तज्ज्ञांनी म्हटले आणि मला नोकरी मिळण्याऐवजी त्यावेळी चौकशीला सामोरे जावे लागले. मात्र त्या घटनेतून मोठा धडा घेतला, पुन्हा चिकाटीने तयारी केली आणि सोमवारी (दि. २२) लागलेल्या निकालात यूपीएससीत देशातून ३०५ वा क्रमांक घेऊन उत्तीर्ण झालो, असे धामणगाव रेल्वे येथील २८ वर्षीय रजत श्रीराम पत्रे यांनी 'दिव्य मराठी'सोबत बोलताना सांगितले. रजत यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण धामणगावातच झाले. त्यानंतर पुण्यात अकरावी, बारावी पूर्ण केले. तसेच भूगोलात पदवी मिळवली. त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी दिल्ली गाठले. पदव्युत्तर शिक्षणासोबतच यूपीएससीची तयारी सुरू केली. याचदरम्यान नेट उत्तीर्ण केली. सुरुवातीला एक, दोन प्रयत्नात अपेक्षित यश मिळाले नाही. मात्र आता तिसऱ्या प्रयत्नात त्यांना यश मिळाले आहे. दिल्लीत यूपीएससीच्या तयारीसोबतच मागील तीन वर्षांपासून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक म्हणून ते काम करत होते. यंदा मुख्य परीक्षेत चांगले गुण मिळाले होते. त्यामुळे मुलाखतीचीही भक्कम तयारी केली होती आणि या वेळी मुलाखतीतही चांगले गुण मिळाल्याचे सोमवारी निकालाअंती समोर आले. या परीक्षेत त्यांना ३०५ वी रँक मिळेल, अशी अपेक्षा नव्हती. आपल्याला ४०० ते ५०० मध्ये रँक मिळेल अशी अपेक्षा असल्याचे रजत म्हणाले. मात्र मुलाखतीत चांगले गुण मिळाल्यामुळेच हे यश मिळाल्याचे आता नक्की झाले आहे. दरम्यान आपण यूपीएससी उत्तीर्ण झालो, ही माहिती धामणगावला कुटुंबीयांना फोनद्वारे दिली, त्यावेळी आईवडिलांसह इतरांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले, मलाही प्रचंड आनंद झाला. मागील अनेक वर्षांपासून केलेल्या श्रमाचे फळ मिळाले आहे. दोन वर्षांपूर्वी मुलाखतीच्या फोटोमुळे मला प्रचंड त्रास झाला. दरम्यान त्यावेळेपासून यूपीएससीने मुलाखतीला पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीच्या दहा दिवसांपूर्वी काढलेला फोटो लावणे अनिवार्य केले असल्याचेही रजत यांनी सांगितले.

# भातकुली तालुक्याच्या आढावा बैठकीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## खासदार बळवंतराव वानखडे, माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर यांनी ऐकल्या नागरिकांच्या समस्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**
सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच महिलांच्या अनेक समस्यांना घेवून जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बळवंतराव वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी सर्वप्रशासकीय विभागांना एकाच छताखाली आणण्यासाठी आढावा बैठकांचे धडकसत्र सुरू केले असून भातकुली तालुक्याच्या समस्यांना घेवून मंगळवारी (ता.२२) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बचत भवन येथे भातकुली तालुका आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याला नागरिकांनी उत्सफुर्त प्रतिसाद दिला. विविध विभागांशी संबंधित समस्यांना घेवून सर्वसामान्य नागरिक, महिला याठिकाणी आल्या होत्या. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना खासदार बळवंत वानखडे यांनी त्या समस्या तातडीने निकाली काढण्याच्या सूचना दिल्यात. यावेळी व्यासपीठावर माजी जिल्हापरिषद सभापती जयंतराव देशमुख, हरिभाउ मोहोड, मुकद्दर खां पठाण, श्रीकांत बोंडे, अभय देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. भातकुली तालुक्यातील प्रशासकीय कार्यालये तसेच विविध विभागांशी संबंधित समस्याना घेवून आजची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. आढावा बैठकीत महसूल विभाग (भातकुली तहसील), पंचायत समिती, वीज वितरण कंपनी, कृषी विभाग, घरकुल निर्माण संबंधी अडचणी, पाणी टंचाई, रोजगार हमी योजना, बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, स्वच्छ भारत मिशन, महिला व बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग, पशुसंवर्धन विभाग, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, उर्ध्व वर्धा प्रकल्प, पाटबंधारे विभाग, उमेद-माविम, सामाजक वनीकरण विभाग, तसेच तालुक्यातील विविध शासकीय कार्यालये तसेच विभागांचा आढावा खासदार बळवंतराव वानखडे तसेच माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर यांनी घेतला .




विद्युत विभागाने घरघुती वीज तसेच कृषी शेतपंप सबंधित कामे पावसाळा सुरू होण्याच्या पूर्वी करावी जेणेकरून नागरिकांना पावसाळ्यामध्ये समस्या येणार नाही आणि वीजपुरवठा सुरळीत राहील यासबंधी सूचना देण्यात आल्या.तसेच उन्हाळ्यामध्ये पाणी टंचाई संबंधित अडचणी तत्काळ निकाली काढण्याच्या सूचना देखील करण्यात आल्या. नागरिकांच्या विविध समस्या शासकीय कार्यालयांमध्ये प्रलंबित असतात, चकरा मारून नागरिक त्रस्त होतात, त्यामुळे आढावा बैठकीच्या माध्यमातून सर्व विभागांचा आढावा घेण्यासाठी खासदार बळवंत वानखडे व ॲड. यशोमतीताई ठाकूर यांनी पुढाकार घेतला आहे. भातकुली तालुकयातील आढावा बैठकीला हरिभाऊ मोहोड , जयंतराव देशमुख, मुकद्दर पठाण, श्रीकांत बोंडे, अभय देशमुख , अभय वंजारी , निलेश कडू , गिरीश देशमुख , सुनील जुनघरे, गजानन ठाकूर तसेच भातकुली तालुक्यातील विविध गावांमधून पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच तथा नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी राष्ट्रपती च्या गावात पाणी टंचाईमुळे ग्रामस्थ झाले आक्रमक

## ग्रामस्थांनी मजीप्रा च्या कार्यालयाला ठोकले कुलूप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ दर्यापूर**
तालुक्यातील माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील चंद्रपूर या गावांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून गावकऱ्यांना पाणी पुरवठा केल्या जातो. मात्र गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्यामुळे,गावातील संतप्त नागरिक व महिला चंद्रपूर येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीवर धडकले. चंद्रपूर येथे असलेल्या पाण्याच्या टाकी मधून तब्बल २५ गावांना पाणी पुरवठा केला जातो. ज्याकरीत येथे तीन कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या तीन कर्मचाऱ्यांपैकी एक कर्मचारी कर्तव्यावर असताना,चंद्रपूर गावातील पाणीपुरवठ्याच्या वेळेमध्ये कपात करून तो पाणीपुरवठा त्याच्या गावाला करतो,तसेच खल्लार स्टॉप वर असलेल्या नळ कनेक्शन धारकांकडे तेथील पाणीपुरवठा करणाऱ्या व्हालचा पाना त्यांच्याकडेच राहत असून, ते कनेक्शन धारक मन मर्जीप्रमाणे केव्हाही पाणी पुरवठा स्वतःकरिता करतात. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा ऱ्हास होत असल्याचा ज्वलंत आरोप गावकऱ्यांनी केला आहे.ज्यामुळे चंद्रपूर येथील पाण्याच्या मेन टाकीमध्ये पाण्याची पातळी खालावते व गावकऱ्यांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागते.पाणीपुरवठा करणाऱ्या प्राधिकरणच्या मेन दरवाजाला कुलूप लावतावेळी गावचे सरपंच चंचल गजभिये,पोलीस पाटील महेंद्र मेश्राम, ग्रामपंचायत सदस्य विशाल घरडे तसेच नागरिक व महिलांनी चंद्रपूर येथून इतर गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या व्हालचे पाने ग्रामपंचायतला जमा केले आहे. जोपर्यंत संबंधित कर्मचाऱ्याची तात्काळ उचल बांगडी करण्यात येत नाही, व गावकऱ्यांना मुबलक पाणी पुरवठा देण्यात येत नाही तोपर्यंत कार्यालयाचा कुलूप तसेच पाने देण्यात येणार नाही अशी ठाम भूमिका ग्रामपंचायत तसेच गावातील नागरिकांनी यावेळी रेटून धरली होती.



गेल्या काही दिवसांपासून गावामध्ये पाणीपुरवठा ठरवल्या वेळेप्रमाणे होत नसून ग्रामस्थ त्रस्त झाले आहे. होत असलेल्या कमी पाणीपुरवठ्यामुळे गावातील नागरिक,महिला पाणीपुरवठा होत असलेल्या स्थानी धडकले. चौकशी केली असता, मुख्य टाकीला पाण्याची पातळी कमी असल्यामुळे नागरिकांना पाण्याची गैरसोय होत असल्याचे सांगण्यात आले. मात्र घडा या गावाला त्याच वेळी येथून पाणीपुरवठा चालू असल्याचे निदर्शनास आले, ज्यामुळे गावकर्यांशी दुजाभाव होतं असल्याचे लक्षात येताच नागरिकांनी तात्काळ टाकी आवाराच्या मुख्य गेटला माझ्या उपस्थितीत कुलूप ठोकले.

**डॉ चंचल गजभिये (सरपंच ग्रा पं चंद्रपूर)**

प्रतिक्रिया :–गेल्या तीन दिवसापासून जलसाठा टाकीमध्ये व्यवस्थित जमा होत नसल्यामुळे गावकऱ्यांना व्यवस्थित पाणीपुरवठा मिळू शकला नाही

**हेमंत काळे** (मजीप्रा चंद्रपूर चौकीदार )

# 'म्हाडा'चा जनता दरबार: तासाभरातच आटोपला

## केवळ सातच तक्रारदार पोहोचले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**
शासनाचे १०० दिवस अभियान आणि मुख्यमंत्र्यांच्या विशेष सूचना या पार्श्वभूमीवर म्हाडाने मंगळवारी पहिला जनता दरबार भरवला. परंतु या जनता दरबारची कोणतीही माहिती नागरिकांना विशेषत: म्हाडा कॉलनीतील रहिवाशांना देण्यात आली नव्हती, असा त्यांचा आरोप आहे. सोमवारी उशिरा रात्री माध्यमांकडे माहिती पाठवून म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी जबाबदारी पूर्ण केल्याचे सोपस्कार पार पाडले. त्यामुळे आजची कारवाई अवघ्या तासाभरात आटोपली. या दरम्यान केवळ सातच तक्रारी जनता दरबारमध्ये आल्या.

म्हाडाचे मुख्याधिकारी (सीओ) विशाल देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली नव्या इमारतीच्या सभागृहात पार पडलेल्या या जनता दरबारमध्ये एक तक्रार लगेच सोडवली गेली. शिवाय उर्वरित तक्रारी सोडवण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना निर्देशही देण्यात आले. जनता दरबारमध्ये पोहोचलेल्या राजू निनाळे यांनी अकोला कार्यालयाची आस्थापना विषयक माहिती अप्राप्त असल्याची तक्रार मांडली. माहिती अधिकाराचा वापर करून त्यांनी तेथे असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांच्या कामांचे स्वरुप आदी बाबी स्पष्ट कराव्यात, असे म्हटले आहे. परंतु ती माहिती त्यांना अद्याप देण्यात आली नाही. त्यामुळे सभाध्यक्ष देशमुख यांनी ही माहिती पुरवण्यात यावी, असे आदेश दिले.




दुसरे तक्रारदार गणेश मेश्राम यांनी मिळकत व्यवस्थापक स्वप्नील भारती यांच्याशी निगडित तक्रार केली होती. दरम्यान त्यांनाही योग्य दिलासा देण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. म्हाडा वसाहतीत राहणारे अन्य एक तक्रारदार शैलेंद्र देशमुख यांनी त्याच्या सदनिकेशेजारील अतिरिक्त जागेची मागणी केली आहे. याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल मागवला आहे. याशिवाय आकाश धवसे आणि संजय कुमरे यांनीही तक्रार देण्यासाठी वेळेवर स्वत:ची नोंदणी केली होती. परंतु प्रत्यक्ष सुनावणीला ते हजर झाले नाहीत, असे म्हाडा अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. जनता दरबारला डेप्युटी सीओ जयकुमार नामेवार, कार्यकारी अभियंता दिलीप कळस्कर, मिळकत व्यवस्थापक स्वप्नील भारती, प्रशासकीय अधिकारी विनोद मोटे व अधिकारी उपस्थित होते.

# मशागतीसाठी ४५ अंशाचा पारा अंगावर झेलतोय बळीराजाजीवाची काहिली

## रखरखत्या उन्हात हंगामपूर्व कामाला सुरुवात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ चांदुर रेल्वे**

अमरावती जिल्ह्याचा पारा ४५अंशावर पोहोचला आहे. भरदुपारी उन्हात घराबाहेर निघणे कठीण आहे. दुपारच्या सुमारास नेहमी गजबजलेले रस्तेही निर्मनुष्य झाले आहेत. मात्र शेतीची कामे आपल्यालाच करावी लागणार, यासाठी उद्याचे स्वप्न डोळ्यांत साठवून जगाचा पोशिंदा शेतकरी रखरखत्या उन्हात ४४ अंशाचा पारा अंगावर झेलत खरिपातील पेरणीसाठी मशागतीत व्यस्त आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही अमरावती जिल्ह्याच्या तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील चार दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. एप्रिल महिन्यात उन्हाचा भडका उडाला आहे. तरीही जगाचा पोशिंदा शेतकरी रखरखत्या उन्हात खरिपातील पेरणीपूर्व मशागतीची कामे करण्यात व्यस्त आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाल्याने शेतकर्यांचे वार्षिक बजेट बिघडले आहे. उत्पादन खर्च वाढला, त्या तुलनेत उत्पादन होत नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतीचे दिवस संपले आहेत. निसर्ग साथ देत नाही. शासन शेतकर्यांच्या पाठीशी उभे राहायला तयार नाही. सारी यंत्रणाच शेतकर्यांनामारक ठरली आहे. तरीही मोठ्या हिमतीने बळीराजा शेती करतो आहे. यंदा कापसाचे, मिरची, सोयाबीनचे दर कोलमडल्याने शेतकर्यांना कवडीमोल भावाने कापूस, सोयाबीन विकावे लागलेत्याचा मोठा आर्थिक फटका शेतकर्यांना बसला आहे. त्यामुळे कर्ज काढून शेती करणार्या शेतकर्यांभोवती कर्जाचा फास दिवसेंदिवस घट्ट आवळत चालला आहे. शेतकर्यांचा आता कुणीच वाली उरला नाही. उन्हाळ्याचे दिवस असल्याने शेतकर्यांनी खरीप हंगामातील मशागतीला सुरुवात केली आहे. यंदा उन्हाळ्यातही अवकाळी पाऊस पडत आहे. त्यामुळे खरिपातील पेरणीसाठी वेळेवर पाऊस पडेल, या आशेवर शेतकरी लगबगीने ४५ अंशाचा पारा अंगावर झेलत रखरखत्या उन्हात शेतीच्या कामात व्यस्त आहेत.

> **मजूर मिळेना; ट्रॅक्टरने मशागत परवडेना**
>
> तप्त उन्हामुळे मजूर मिळेनासे झाले आहेत. त्यामुळे शेतमजुरांना मोठा भाव आला आहे. ट्रॅक्टरने शेतीची मशागत करणे परवडेनासे झाले आहे. त्यामुळे शेतकर्यांपुढे अडचण निर्माण झाली आहे.

## केंद्र सरकारच्या पाठीशी 'मनसे' उभी: एकदाच काय तो दणका देण्याचे आवाहन

### पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर राज ठाकरे आक्रमक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई** – पुलवामा हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये मंगळवारी सर्वात मोठा दहशतवादी हल्ला झाला. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला, ज्यामध्ये २७ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एक इटालियन आणि एक इस्रायली पर्यटक आणि दोन स्थानिक नागरिकांचा समावेश आहे. उर्वरित पर्यटक गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू आणि ओडिशातील आहेत. या घटनेनंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केंद्र सरकारला कडक कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. इतकेच नाही त्यासाठी मनसे सरकारच्या पाठीशी पूर्णपणे उभी असल्याचा विश्वासही राज ठाकरे यांनी दिला आहे.या संदर्भात राज ठाकरे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून मनसेची भूमिका स्पष्ट केली आहे. १९७२ साली म्युनिक ऑलिम्पिकच्या वेळेस इस्रायली खेळाडूंवर पॅलेस्टिनी अतिरेक्यांनी हल्ला केला... यानंतर इस्रायलने या अतिरेक्यांना, या हल्ल्याच्या सूत्रधारांना अशा पद्धतीने मारलं होतं की पुढे दीर्घकाळ पॅलेस्टिनी लोकांच्या मनात दहशत बसली होती. तशीच दहशद येथे देखील बसवण्याची अपेक्षा राज ठाकरे यांनी व्यक्त केली आहे.

## अमरावतीत विद्यार्थी छर्ऱ्यांच्या बंदुकीसह पोहोचला शाळेत , डॉक्टर वडिलांविरुद्ध पोलिसांत गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती** सातव्या वर्गातील १३ वर्षीय विद्यार्थी थेट बंदूक घेऊन शाळेत पोहोचला. या मुलाच्या स्कूल बॅगमध्ये बंदूक असल्याची माहिती शाळेकडून पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पोलिस शाळेत पोहोचले व मुलाकडून बंदूक ताब्यात घेतली. ही बंदूक छर्रे मारण्याची असल्याचे समोर आले असून, ती बंदूक त्याच्या वडिलांनी घरात ठेवल्याचे समोर आले आहे. हा धक्कादायक प्रकार सोमवारी २१ एप्रिलला गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत समोर आला. या प्रकरणी पोलिसांनी मुलाच्या डॉक्टर वडिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला. दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील घोटी येथील एका शाळेतील पाच ते सहा विद्यार्थ्यांच्या स्कूल बॅगमध्ये ७ एप्रिलला फायटर, चाकू अशी शस्त्र आढळले होते.



सोमवारी दुपारी शाळेत आल्यानंतर सातवीतील या विद्यार्थ्याच्या स्कूल बॅगमध्ये बंदूक असल्याची बाब शिक्षकांना लक्षात आली. या प्रकाराने शिक्षकही चांगलेच घाबरून गेले. त्यांनी तातडीने याबाबत गाडगेनगर पोलिसांना माहिती दिली. शाळकरी मुलाजवळ बंदूक असल्याची माहिती मिळताच पोलिस तातडीने शाळेत पोहोचले. त्यावेळी या मुलाच्या स्कूल बॅगमधून पोलिसांनी बंदूक ताब्यात घेतली. ही बंदूक लोखंडाची आहे. पोलिसांनी बारकाईने निरीक्षक केले असता ही बंदूक छर्रे मारण्याची असल्याचे समोर आले. बंदूक छर्रे मारण्याची असली तरीही ती घातक आहे. दरम्यान, त्या मुलाला विचारले असता त्याने सांगितले की, घरी ठेवलेली बंदूक मी आणली. पण कशासाठी आणली, त्याचा उद्देश काय होता, याबाबत माहिती समोर आली नाही. या प्रकारानंतर पोलिसांनी त्याच्या वडिलांना बोलवले. काही वर्षांपूर्वी मुंबईतून छर्रे मारण्याची ही बंदूक आपण खरेदी केली होती, ती घरात ठेवली होती. मुलाने तीच उचलून आणली, असे त्यांनी सांगितले. दरम्यान या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी मुलाच्या वडिलांविरुद्ध आर्म क्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

## दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा कापूस संपताच भाव ८ हजारांवर

### शेतकऱ्यांनी आधी मिळेल त्या भावात कापूस विकला, आता भाववाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३दर्यापूर** – यंदाचा कापूस हंगाम संपत आला असताना 'पांढऱ्या सोन्याच्या' दरात वाढ झाल्याचे दिसत आहे. दर्यापूर शहर व तालुक्यात शेतकऱ्यांनी कापसाच्या भावात वाढ होईल, या आशेने घरात साठवलेला कापूस लग्नसराईमुळे विकला. मात्र, शेतकऱ्यांकडील कापूस संपताच पांढऱ्या सोन्याच्या भावात वाढ झाली आहे. शेतकऱ्यांजवळचा माल संपतो, तेव्हा भाव वाढतात. हे गणित दरवर्षीचे झाले आहे. त्यामुळे नेमके काय करायचे, कापूस विकायचा की, साठवून ठेवायचा अशी द्विधा मन:स्थिती कापूस उत्पादकांची झाली आहे. या वर्षीचा कापूस हंगाम संपल्यानंतर ८ हजार रुपये भाव झाला आहे. दर्यापूर तालुक्यात सतत भाव कमी होऊ लागल्याने तसेच लग्नसराईचे दिवस असल्याने शेतकऱ्यांनी भाववाढीच्या आशेने साठवलेला शेतातील सर्व कापूस मिळेल त्या भावात विकला.कापूस घरात जास्त दिवस साठवून ठेवला तर त्याची गुणवत्ता खालावू लागते. कापूस काळवंडून जातो आणि वजनात घट होते. तसेच खाजणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव वाढतो. त्यातच पुन्हा प्रत्येक वेळी खत, औषधी, उधारी तसेच सोने तारण सोडवणे गरजेचे असल्याने शेतकऱ्यांनी आपल्याकडील सर्व कापूस विकला. या वर्षी सीसीआय केंद्राने देखील लवकरच कापूस खरेदी बंद केली. त्यामुळे शेतकऱ्यांनी कापूस विकून टाकला. मात्र, मागील



> शेतकऱ्यांना कीटकनाशक फवारणीवर हजारो रुपये खर्च करावा लागतो. तसेच शेतीची मशागत आदी कामांसाठी मजूर भेटत नाहीत. मागील काही वर्षांपासून निसर्गाच्या अवकृपेने शेती तोट्यात जात आहे. उत्पादन खर्चही निघणे कठीण होत आहे. अडीअचणींमुळे शेतकऱ्यांनी मिळेल त्या किमतीत कापूस विकला. आता कापसाचे भाव वाढले. त्यामुळे या भाववाढीचा नेमका फायदा कोणाला, हा संशोधनाचा विषय आहे. एकंदरीतच शेती करणे आता कठीण झाले आहे.
>
> **–शंकरराव गुल्हाने, शेतकरी, दर्यापूर**

पंधरवाड्यापासून कापसाचे दर ८ हजार रुपये झाल्याने ही भाववाढ म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखे आहे. कापसाचा खरेदी–विक्री हंगाम ऑक्टोबर–नोव्हेंबरपासून सुरू होतो. सुरुवातीला शेतकऱ्यांना कापसाच्या दर्जानुसार ६ हजार ८०० ते ७ हजार १०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला होता. सीसीआयने नोव्हेंबरपासून ७ हजार २०० ते ७ हजार ४०० रुपये क्विंटल प्रमाणे खरेदी सुरू केली. काही खासगी व्यापाऱ्यांकडूनही ७ हजार भाव देण्यात आल्याने शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना कापूस विकला. दरम्यान, कापसा बरोबरच सरकीच्या दरातही तेजी आली आहे. सध्या सरकीला ४ हजार २०० रुपये भाव आहे.कापसाचे आणखी भाव वाढण्याची शक्यता दर्यापूर तालुक्यात मे २०२१–२२ मध्ये फरताड कापसाला १२ ते १४ हजार भाव मिळाला. त्यानंतर २०२३ मध्ये ९ हजार ६०० भाव मिळाला. परंतु, नंतर शेतकऱ्यांनी प्रत्येक वर्षी भाव वाढ होईल, या आशेने कापूस साठवला. मात्र शेवटी ६ हजार ५०० ते ७ हजार १०० रुपयाने कापूस विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली. आणि आता सर्व कापूस संपताच ८ हजार रुपयांवर भाव गेले आहेत.

## उद्धव यांनी राज ठाकरेंपुढे लहान मुलासारख्या अटी ठेवल्या:उदय सामंत यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई** – उद्धव ठाकरे यांनी मनसेशी युती करण्यासाठी राज ठाकरे यांच्यापुढे एखाद्या लहान मुलांसारख्या अटी ठेवल्या असल्याची टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते तथा मंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी केली. यावेळी त्यांनी चारचाकी व वार्षिक उत्पन्न अडीच लाखांहून अधिक असणाऱ्या महिलांचे लाडकी बहीण योजनेचा निधी बंद होणार असल्याचेही सांगितले.



उदय सामंत मंगळवारी मुंबईत पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवर शासन विचार करून योग्य तो निर्णय घेईल. पण ही योजना बंद केली जाईल, लाभार्थी महिलांचा आकडा कमी केला जाईल आदी चुकीची माहिती विरोधकांकडून पसरवली जात आहे. सरकारची भूमिका या प्रकरणी अत्यंत स्पष्ट आहे. ज्या माताभगिनींनी चारचाकी असताना व वार्षिक उत्पन्न अडीच लाखांहून अधिक असताना अनावधानाने योजनेची नोंदणी केली, अशा महिलांचे अर्ज बाद केले जातील. उर्वरित कोट्यवधी महिलांना या योजनेचा आहे तसा लाभ मिळेल.

राज ठाकरे उद्धव यांच्याशी युती करतील असे वाटत नाही

ते पुढे म्हणाले, राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या विषयावर मी यापूर्वीच माझी भूमिका स्पष्ट केली आहे. लहान मुले जसे शाळेत डबा खाताना तू याच्याशी बोलू नको, त्याच्याशी बोलू नको, तरच मी तुला चपाती खायला देतो अशा अटी घालतात. तशाच अटी उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरेंपुढे ठेवल्या आहेत. त्यामुळे राज ठाकरे या अटी मान्य करतील असे मला वाटत नाही. त्यांचा एक विचार आहे. त्यांचा स्वतंत्र पक्ष आहे. त्यांना झुकवून कुणी युती करण्याचा प्रयत्न करत असेल तर तो यशस्वी होणार नाही असे मला वाटते.

## हिंदी भाषा सक्तीला अखेर स्थगिती, शिक्षणमंत्री दादा भुसेंची सारवासारव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई–** पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या राज्य सरकारच्या निर्णयाला राज्यभरातून तीव्र विरोध आणि टीका झाल्यानंतर, अखेर सरकारला हिंदी भाषा सक्तीचा निर्णय मागे घ्यावा लागला आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी हिंदी भाषा सक्तीला स्थगिती दिल्याची घोषणा मंगळवारी एका पत्रकार परिषदेत केली. यासंदर्भात सुधारित शासन निर्णय काढण्यात येईल, असेही भुसे यांनी स्पष्ट केले.नव्या शैक्षणिक धोरणात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषेचे शिक्षण बंधनकारक करण्यात आले होते. त्याला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विरोध केला. महाराष्ट्रात केवळ मराठी भाषेचीच सक्ती असावी. तसेच आम्ही हिंदू आहोत पण हिंदी नाहीत, असे ते म्हणाले होते. त्यानंतर राज्यभरात मनसे कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. अखेर हिंदी भाषेला होत असलेला विरोध लक्षात घेऊन राज्य सरकारने हिंदी सक्तीचा निर्णय स्थगित केला आहे.

**मराठी बंधनकारकच....**

मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये मराठी विषय बंधनकारक केला आहे. परंतु, इतर माध्यमाच्या शाळांमध्येसुद्धा मराठी भाषा विषय बंधनकारक करण्यात आला आहे. त्या शाळेत मराठी शिकवणारे शिक्षकसुद्धा मराठी भाषेत पदवी मिळवलेले असावेत, असे निर्देश दिले.

## राज्यात ८० अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

### उपजिल्हाधिकाऱ्यांना बढती, महसूलमंत्र्यांचा मोठा निर्णय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई** राज्यातील ८० उपजिल्हाधिकाऱ्यांना अप्पर जिल्हाधिकारी या पदावर बढती देऊन त्यांच्या नियुक्तींचे शासन आदेश आज काढण्यात आले. विशेष म्हणजे, तहसीलदारपदाचीही निवडसूची लवकरच होणार आहे. दीड महिन्याआधी महाराष्ट्रात साठ अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवडश्रेणीत देऊन त्यातील ३४ अधिकाऱ्यांना जिल्हा जात पडताळणी समितीचे अध्यक्ष करण्यात आले होते, त्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना तातडीने जात प्रमाणपत्रे मिळण्यास गती मिळाली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शंभर दिवसांच्या धडक कृती कार्यक्रमातील हा एक महत्त्वाचा निर्णय आहे.

**विदर्भ,मराठवाड्यातील रिक्त पदे भरली**

आजच्या पदोन्नती निर्णयामुळे विदर्भ व मराठवाड्यातील अधिकाऱ्यांची अनेक रिक्त पदे भरण्यात आली आहेत. महसूल विभागातील एकाच ठिकाणी अनेक वर्ष राहण्याचा पायंडा या बदली व पदोन्नतीमुळे बदलल्यात आला. दुर्गम भागात अनेक वर्ष राहिलेल्या अधिकाऱ्यांना मुंबई, पुणे या शहरातही बढती व बदली देण्यात आली. अप्पर जिल्हाधिकारी पदांवरील नेमणुकीमुळे आता महसूल विभागातील जिल्हास्तरीय सुनावण्या मोठ्या प्रमाणात होऊन त्यांचा निपटाराही होईल.

चंद्रशेखर बावनकुळे हे महसूल मंत्री झाल्यापासून महसूल विभागातील आस्थापनाविषयक अनेक प्रलंबित कामे झपाट्याने मार्गी लागले आहेत. या संपूर्ण बढत्यांमध्ये पारदर्शकता आहे. वर्षानुवर्षे बढत्या होत नसल्यामुळे उपजिल्हाधिकारी वर्गात शिथिलता आली होती. आजच्या या आदेशाने अधिकारी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. यापूर्वी अप्पर जिल्हाधिकाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी तयार करण्यात आली. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांचे निवड श्रेणी पदी नियुक्तीचे आदेश देण्यात आले. जात पडताळणी समितीवर महाराष्ट्रभर अध्यक्ष नेमण्यात आले. उपजिल्हाधिकाऱ्यांनाही निवड श्रेणीचा दर्जा देण्यात आला तसेच आज उपजिल्हाधिकाऱ्यांना अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर बढती देऊन त्यांची पदस्थापना ही करण्यात आली.

महसूल विभागात गेल्या १५ते १९ वर्षांपासून उपजिल्हाधिकारी पदांवरील अधिकाऱ्यांना बढती देण्यात आली नव्हती. एकाच पदावर अनेक वर्षे काम केल्याने येणारा तोच तोपणा या निर्णयाने निघून, महसूल विभागात नवचैतन्य निर्माण व्हावे, अशी अपेक्षा चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली आहे.

# चांदुर बाजार तहसील सभागृहात उद्या ६६ ग्रापं. सरपंचपदाची होणार सोडत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३चांदुर बाजार**



स्वराज्य संस्थाच्या निवडणुका केव्हा होणार याकडे स्थानिक राजकीय नेत्यांचे लक्ष केंद्रीत असतांना शासनाच्या निर्देशानुसार तालुक्यातील ६६ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. येत्या २४ एप्रिल रोजी तालुक्यातील सर्वच्या सर्व ६६ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण तहसील कार्यालयाचे सभागृहामध्ये काढण्यात येणार आहे. याकरीता तहसिल कार्यालयातील निवडणूक विभागाची तयारी पुर्ण झाल्याचे निवडणुक विभागाचे नायब तहसीलदार सुधाकर एम्बलवार यांनी दिली.

तालुक्यात एकूण ६६ ग्रामपंचायती असून त्यापैकी अनुसूचित जातीसाठी एकूण १५ सरपंचपदे आरक्षित आहे. त्यातील ८ महिला सरपंच राहणार आहेत, अनुसूचित जमातीकरीता एकूण ६ सरपंचपदे आरक्षित आहे त्यातील ३ महिला सरपंच राहणार आहेत. नामाप्रकरीता एकूण १२ सरपंचपदे आरक्षित आहे त्यातील ६ महिला सरपंचराहणार आहेत तर खुल्या प्रवर्गासाठी एकूण ३३ सरपंच पदे राहतील त्यापैकी १७ठिकाणी महिला सरपंच विराजमान होतील. तालुक्यातील सिरजगाव कसबा, देऊरवाडा, काजळी, निभोरा, माधान, जसापूर, सर्कापुर, घाटलाडकी, विश्रोळी, रेडवा, बेलमंडळी. ब्रा.थडी. वणी, सुरळी, सिरजगाव बंड, आखदवाडा, बेसखेडा, नानोरी, ब्रा.पाठक, बेलोरा, राजुरा, वाठोंडा, चिचोली काळे, मिर्झापूर, जालनापूर, सोनोरी, कुरणखेड, निमखेड करजगाव, कारंजा-बहिरम, बोदड, गोविदपुर, रतनपुर, कल्होडी, कु-हा, तळेगाव मोहना, बोरगाव मोहनाकोंडवर्धा, बेलज, तोंडगाव, लाखनवाडी, थुगाव-पिपरी, हिरुळ पूर्णा, पिंपरी-थुगाव, कुरळपूर्णा, मासोद, फुबगाव, सर्फाबाद, तुळजापूर गढी, हैदतपुर, आसेगाव पूर्णा, टाकरखेडा पूर्णा, विरुळ पुर्णा, तळणी पूर्णा, दहीगाव पुर्णा, कृष्णापुर, रसुल्लापुर, धानोरा पुर्णा, राजना पुर्णा, तळवेल, वडुरा, खरवाडी, जवळा, खराळा, बोराळा, जैनपुर या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण काढण्यात येणार असल्याची माहीती निवडणुक संगणकिय लिपीक राम वानखडे यांनी दिली. २४ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता तहसिल कार्यालयाच्या सभागृहामध्ये या सर्व ६६ग्रामपंचायतींची उपविभागीय अधिकारी बळवंत अरखवार, तहसिलदार रामदास शेळके यांचे उपस्थितीत ही सोडत काढण्यात येणार असल्याची माहीती निवडणुक विभागाचे नायब तहसिलदार सुधाकर एम्बलवार यांनी दिली.

# आठ दिवसांत शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलन

## शेतकरी विकास आघाडीचे तहसीलदारांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अंजनगाव सुर्जी**

आठ दिवसात शेतकऱ्यांना न्याय न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकरी विकास आघाडीने तहसीलदारांना निवेदनाद्वारे दिला आहे. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील संत्रा, लिंबू फळबाग आपत्कालीन मदत के. वाय. सी. झालेले शेतकऱ्याच्या खात्यात रक्कम त्वरित जमा करावी, महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेले फळबाग लाभधारक शेतकऱ्यांना देण्यात येणारी नैसर्गिक आपत्कालीन मदत मिळण्यास अनेक गावांच्या लाभार्थी शेतकऱ्यांनी के. वाय. सी. करूनही त्यांचे बँक खात्यात मदत रक्कम जमा करण्यास विलंब होत आहे तसेच काही गावातील याद्या प्रसिद्धीस विलंब होत आहे.

तलाठ्यांनी संबंधित लाभार्थ्यांना व्हीके नंबर देऊन के. वाय. सी. करण्यास सांगण्याचा आदेश तातडीने द्यावा. नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना तातडीने कर्जपुरवठा करण्यात यावा, अशा आशयाचे निवेदन तहसीलदार सौ. पुष्पा सोळंके यांना देण्यात आले असून आठ दिवसांत शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला.याप्रसंगी राहुल पिंपळकर जिल्हा कार्यकारिणी सदस्य भारत कृषक समाज, नरेंद्र निचळ माजी अध्यक्ष किसान जिनिंग प्रेसिंग अंजनगाव सुर्जी, प्रशांत भगत संचालक किसान जिनिंग अंजनगाव, गणेश गिते, प्रवीण पारे, राजेंद्र रेखाते, डॉ प्रकाश भदे, शरद लव्हाळे, उद्धव गिते, किरण टेकाडे, राहुल रोदळे आदी उपस्थित होते.

# लेहेगाव ग्रामपंचायतने घेतली मुक्या जनावरांची काळजी....



विदर्भात सर्वत्र उष्णतेची लाट आली असल्याने मानवाप्रमाणे प्राण्यांना आपली ताहन भागवण्याकरिता लेहेगाव ग्रामपंचायती ने नुकतेच बांधलेला गाव हौद पशु पालकांसाठी वरदान ठरत आहे.(छाया : सचिन शेगोकार)

# दुपारी ट्रॅफिक सिग्रल राहणार बंद वाहतूक विभागाचे मनपा आयुक्तांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

शहरातील वाढते तापमान पाहता, वाहतूक पोलिस विभागाचे सहायक पोलिस आयुक्तांद्वारा मनपा आयुक्तांच्या नावे जारी पत्रामध्ये दुपारी १ ते ५ या वेळात वाहतूक सिग्नल बंद ठेवण्याचे म्हटले आहे. ट्रॅफिक एसीपी कार्यालयाच्या वतीने जारी पत्रानुसार, ट्रॅफीक सिग्नलवर उन्हात उभे राणाऱ्या वाहनचालकांना उष्माघाताचा धोका असतो. त्यामुळे यावेळीवाहतूक नियंत्रक व्यवस्था बंद ठेवण्यात यावी असे नमूद करण्यात आले आहे.

**ग्रीन नेटच्या व्यवस्थेचा अभाव**

शहरातील राजकमल चौक, पंचवटी चौक, इर्विन चौक, शेगांव नाका, गर्ल्स हाईस्कूल चौक व शिवटेकडी चौक अशा ठिकाणी ग्रीन नेटची व्यवस्था नाही. यामुळे ट्राफिक सिग्नलवर वाहन चालकांना कडक उन्हाचा सामना करावा लागतो.

# धूम स्टाईल स्टंटबाजी करणाऱ्यांची खैर नाही

## शहरातील सर्व उड्डाणपुलांवर लागणार सीसीटीव्ही कॅमेरे : दिल्ली, पुणेच्या कंपनीचे पथक शहरात दाखल : नियंत्रण कक्षासह वाहतूक शाखेत मॉनिटरिंग सेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**



र इ ॅ स ज ा द्य ा दुचाकीस्वारांकडून रात्री बे रात्री उड्डाण पुलावर होणारी धुम स्टाईल स्टंटबाजी थांबविण्यासाठी, अपघात टाळण्यासाठी आता वाहतूक पोलिस शहरातील सर्व उड्डाण पुलावर सीसीटीव्ही कॅमेरे लावणार आहे. ज्याएस्प्रोविझनकंपनीला हा कंत्राट दिला आहे. त्या कंपनीच्या दिल्ली, पुणे येथील पथकाने आज २२ एप्रिल रोजी शहरात येऊन वाहतूक विभागाच्या पीआय रिटा उईके व पीआय ज्योती विल्हेकर यांच्यासह शहरातील सर्व उड्डाण पुलाची पाहणी केली.

शहरातील पंचवटी तिहेरी उड्डाण पुल, इर्विन ते राजापेठ व राजापेठ ते नंदा मार्केट, बडनेरा मार्ग कुशल ऑटोजवळया तिन्ही पूलावर रात्री बाईक रायडर मोठ्या प्रमाणात स्टंड रायडींग करतात. तसेच बहुतांश दुचाकी, चारचाकीसह सर्वच प्रकारच्या वाहनाचे चालक वाहनाच्या गतीवर सुध्दा नियंत्रण ठेवित नाही. परिणामी अपघात होऊन वाहन चालकांचा किवा सामान्य नागरिकांच्याजिवितास धोका निर्माण होऊ शकतो. यासाठी दोन महिन्यापूर्वी सीपी नविनचंद्र रेड्डी यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये शहरातील उड्डाण पुलावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा प्रस्ताव डीसीपी कल्पना बारवकर, वाहतुक पश्चिम विभागाच्या पीआय रिता उईके, पूर्व विभागाच्या पीआय ज्योती विल्हेकर यांनी सीपी रेड्डींकडे उपस्थित केला. त्यानुसार सीपी रेड्डींनी हा प्रस्ताव मुंबई डीजी ऑफीससह शासनाला पाठविला. शासनाने हा प्रस्ताव मंजूर करून अमरावती शहरातील सर्व उड्डाण पुलावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा कंत्राट पुणे येथील एस्प्रोव्हिजन कंपनीला दिला. आज एस्प्रोव्हिजन कंपनीचे दिल्ली, पुणे येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकाने शहरात येऊन वाहतुक पोलिस निरिक्षकांसोबत शहरातील सर्व उड्डाण पुलाची पाहणी केली.

शहरातील सर्व उड्डाण पुलावर टर्निंगसह ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येईल. हे कॅमेरे पुलावरील सपूंर्ण मार्गाचा भाग कव्हर करतील. तसेच पुलावरून मुख्य चौकाच्या दिशेने देखील केमेरे लावण्यात येणार आहे.इर्विन ते राजपेठउड्डाण पुलावर मालवीय चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौकात बाहेरील भाग कव्हर करणारे तसेच संपूर्ण पुलाचादोन्ही बाजूचा रस्ता कव्हर करणारे कॅमेरे लावण्यात येणार आहे. अशाच प्रकारे राजापेठ ते नंदा मार्केट, बडनेरा मागीवरील कुशल ऑटो पर्यंत व नेमानी इन गोदामा समोरी उड्डाण पुल, बडनेरा रेल्वे पुलावर देखील सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहे. स्टंट रायडर, हिट ण्ड रनच्या घटना, गुन्हेगारी कारवायासह अनेक बाबींवर आता सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर राहणार आहे.

# नाफेडची तूर खरेदी मंदावली : चुकारे रखडल्याचा परिणाम : शेतकऱ्यांचा खुल्या बाजाराकडे कल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**



शासनाने नाफेडच्या माध्यमातून चणा व तुरीची हमीभावाने शासकीय खरेदी प्रारंभ केली. मात्र, दोनही शेतमालाची खरेदी रखडल्याचे चित्र सध्या शासकीय केंद्रांवर दिसून येत आहे. चण्याची खरेदी अद्याप सुरूच होऊ शकलेली नाही, तर तूर विक्रीसाठी केंद्रांवर शेतकरीच येत नसल्याने खरेदी संथगतीने सुरू आहे. यामागे नाफेडकडून चुकारे रखडल्याचे कारण असल्याचे सांगण्यात आल आहे.

खुल्या बाजारात तुरीला कमी भाव मिळत असल्याने शासनाने नाफेडमार्फत हमीभावाने खरेदी सुरू करण्याचा निर्णय घेतला. आधी खरेदीचे निकष निश्चित होत नसल्याने खरेदी प्रक्रियेस विलंब झाला. त्यानंतर निकष निश्चित झाल्यानंतर जिल्ह्याच्या उत्पादन सरासरीवर पंचवीस टक्के तूर खरेदीचे सूत्र निश्चित झाले. त्यानुसार जिल्ह्यासाठी ३९ हजार ६५४ टन खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले. त्यासाठी ऑनलाइन नोंदणी व नंतर खरेदी प्रारंभ करण्यात आली. आतापर्यंत जिल्हा मार्केटिंगकाडे ३ हजार ८३८ व विदर्भ मार्केटिंगकडे ५ हजार ५६० अशा एकूण ९ हजार ३९७ शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी झाली आहे. यापैकी २ हजार ८५८ शेतकऱ्यांची तूर हमीभावाने खरेदी झाली. ६ हजार ५३९ शेतकऱ्यांची तुर अद्याप शिल्लक आहे ज्या शेतकऱ्यांनी नाफेडला तूर विकली,त्यातील बऱ्याच शेतकऱ्यांना अद्याप चुकारे मिळाले नसल्याने नाराजी निर्माण झाली आहे.या नाराजीतूनच नाफेडकडे चुकाऱ्यास विलंब होतो, या समजुतीने शेतकऱ्यांनी खुल्या बाजारात नगदी चुकाऱ्यासाठी धाव घेतली आहे. मंगळवार, २२ एप्रिल रोजी येथील बाजार समितीत २ हजार ७२८ पोत्यांची आवक नोंदविण्यात आली. ऑनलाइन नोंदणी झालेले शेतकरी संदेश दिल्यानंतरही केंद्रांवर तूर विक्रीसाठी येत नसल्याचे सांगण्यात आले. विशेष म्हणजे, खुल्या बाजारात हमीभावाच्या तुलनेत ५७५ ते ६०० रुपये सरासरी दर कमी मिळत आहे. शासनाने तुरीला ७ हजार ५५० रुपये प्रतिक्विंटल दर दिला आहे, नाफेडनेचण्याच्या नोंदणीस २७ मार्चपासून प्रारंभ केला. दोन एप्रिलपासून खरेदी प्रारंभ करण्यात आली. जिल्ह्यात आतापर्यंत ५७३ शेतकऱ्याची नोंदणी झाली आहे. मात्र, खरेदी एकाही शेतकऱ्याच्या मालाची झालेली नाही. वासंदर्भात मिळवलेल्या माहिती सार विदर्भ मार्केटिंगकडे ४९८ अर्ज आले असून १९० शेतक-यांचे अर्ज अपलोड झालेले नाहीत. एनईएमएल पोर्टलवर तांत्रिक अडचणीमुळे नोंदणी होत नसल्याचे सांगण्यात आले.

**तूर नोंदणीला ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ**

तुरीची खरेदी संथगतीने सुरू असताना व शेतक-यांमध्ये शासकीय केंद्रांवर तूर विक्रीस उत्साह नसताना पणन व सहकार विभागाने मंगळवार, २२ एप्रिल रोजी तुरीच्या ऑनलाइन नोंदणीस ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. आतापर्यंत जिल्ह्यात १ हजार ३९७ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

# सुकळी कंपोस्ट डेपोतील ५ लाख घ.मी. कचऱ्याची विल्हेवाट

## सर्वोच्च न्यायालयात महापालिकेचे प्रतिज्ञापत्र : २५ एप्रिलला सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती**

सुकळी कंपोस्ट डेपोतील जवळपास ५ लाख घ.मी. कचऱ्याचे विलगीकरण करून विल्हेवाट लावण्यात महापालिका प्रशासनाला यश आले असून, उर्वरित कचऱ्याची विल्हेवाट येत्या ३० मेपर्यंत पूर्ण करण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. याबाबतचे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आले आहे.सुकळी डेपो येथे कचऱ्याचा भला मोठा डोंगर उभा झाल्याने त्यातून निघणाऱ्या दुर्गंधीमुळे आजूबाजुच्या नागरिकांनाही श्वासोच्छवासाचा व दूषित पाण्याचाही त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे या प्रकरणात पर्यावरणप्रेमीकडून 'एनजीटी' कडे तक्रार दाखल करण्यात आली. एनजीटीने काही वर्षांपूर्वी महापालिकेला मोठा आर्थिक दंडही ठोठावला. त्यानंतर महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊन दंडाला स्थगिती मिळविली. २०१८ पासून हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

त्यानंतर २०१९ पासून येथील घनकचऱ्यावर बायोमायनिंगची प्रक्रिया सुरू झाली. सोबतच तेथील प्लास्टिक, दगड व इतर घनकचऱ्याचेही विलगीकरण करण्यात येत आहे. येथे २०२२ पर्यंत तब्बल ५ लाख १९ हजार ९९६ घ.मी. एवढा घनकचरा जमा झाला होता. त्यापैकी आतापर्यंत जवळपास ९७ टक्के कचऱ्याची विल्हेवाट लागली असून, केवळ १५ हजार ४१० घ.मी. कचराच शिल्लक असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. याशिवाय जमिनीचा पृष्ठभाग समतल करताना (एसएलएफ) कचऱ्याचीही विल्हेवाट लावण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणी येत्या २५ एप्रिलपर्यंत न्यायालयात सुनावणी होणार आहे.

# महिला कैदी यांना कापडी बॅग बनविण्याचे पंधरा दिवसीय प्रशिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**



महिला व बाल विकास विभाग महानगरपालिका अमरावती द्वारा जिल्हा मध्यवर्ती कारागृह येथील महिला कैदी यांना कापडी बॅग बनविण्याचे पंधरा दिवसीय प्रशिक्षण देण्यात आले, दिनांक २/४/२५ ते २२/४/२५ या कालावधी मध्ये सदर प्रशिक्षण घेण्यात आले, यामध्ये साडी कव्हर, ब्लाउज कव्हर, मनी पर्स अश विविध १५ प्रकारचे कापडी बॅग शिकविण्यात येऊन यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिला कैदी यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पमाणपत्र देऊन समरोप करण्यात आला . या समारोपीय कार्यक्रम ला श्री महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त, श्री नरेंद्र वानखडे उपायुक्त (२), तसेच श्री प्रकाश मेश्राम शिक्षणाधिकारी तथा महिला व बाल विकास अधिकारी, किर्ती चिंतामणी , अधीक्षक, जिल्हा मध्यवर्ती कारागृह अमरावती उपस्थित होत्या. महानगर पालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांचे मार्गदर्शनात आणि संकल्पनेतून महिला कैदी शिक्षा भोगून बाहेर गेल्यावर त्यांना स्वयंरोजगार करून आपला उदरनिर्वाह योग्य प्रकारे करता यावा आणि समाजात सन्मानाने वावरता यावे. हा प्रशिक्षण देण्यामागचा हेतू होता. त्यानुसार प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी झाल्याबद्दल समाधान व्यक्त करीत महिलांसाठी उपयुक्त योजना राबविण्याचा महानगर पालिका प्रयत्न करत राहील, असा विश्वास व्यक्त केला.

या प्रशिक्षणाचे कार्यक्रम समन्वयिका सौ अवंती साखरे, श्री ज्ञानेश्वर कुकडकर, प्रशिक्षिका म्हणून सौ राणी रायकवार तसेच या कार्यक्रमास प्रियंका चौहाण व श्री अमोल साकुरे यांचे सहकार्य लाभले.

# युद्धस्तरावर पाईलाईन दुरुस्ती काम सुरु : दुरुस्ती कामामुळे २ दिवस शहराचे पाणी बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**



अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या नेर पिगल्यई बी. पी. टी. पासून येणारी १५०० मीमी व्यासाची पी.एस.सी. वाहीनीवरील नांदगाव ते माहुली दरम्यान पाईपलाईन गळती दुरुस्तीचे काम युद्धस्तरावर सुरु आहे. या कामासाठी १७-१८ मजूर तसेच मजीप्राचे ५-६ अधिकारी २४ तास लक्ष ठेवून आहेत. बुधवार २३ एप्रिलला दिवसअखेर काम पूर्ण लय झाल्यास, गुरुवार २४ एप्रिलला पाणी पुरवठा सुरु होईल, असे मजीप्रा अधिकाऱ्यांनी सांगितले.नांदगाव ते माहुली दरम्यान पाईपलाईन दुरुस्तीचे काम करण्यात येत आहे. मंगळवारला सकाळी ७-८ वाजतापासून दुरुस्ती कामाला सुरुवात झाली. या कामासाठी साईटवर पोकलैंड, जेसीबी, ठेकेदार अनिल भटकर यांच्या टिममधील १७-१८ मजुरांनी मंगळवारला सकाळी कामाचा शुभारंभकेला. प्रथम पोकलैंड आणि जेसीबीच्या माध्यमातून पाईपलाईन पर्यंत मोठा खड्डा करण्यात आला. त्यानंतर भर उन्हात ४४ डीग्रीच्या तापमानात मजुरांनी गळती असलेले पाईप बाहेर काढण्याचे काम केले. सायंकाळी पाचवाजेपर्यंत मलबा उपसणे आणि गळती असलेले पाईप मोकळे करण्याचे काम सुरु होते. रात्रभर हे काम सुरु राहणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. विशेष म्हणजे साईटवर मजिप्राचे कार्यकारी उपअभियंता संजय लेवरकर, अभियंता मनोजवाकेकर, विवेक सोळंके, शाखा अभियंता गुरुदत्त अविनाशे आदींसार अन्य अधिकाऱ्यांची टिम जातीने लक्ष देत होते.


**आज सायंकाळपर्यंत काम होणार पूर्ण**

दरम्यान, रात्रभर सुरळीत काम झाल्यास, बुधवारला सायंकाळ काम पूर्ण होईल, असा विश्वा मजीप्रा अधिकाऱ्यांनी व्यक्त केला त्यानंतर गुरुवार २४ एप्रिलला लोअर झोन आणि शुक्रवार २५ एप्रिलला अप्पर झोनमध्ये पाणी पुरवठा करण्यात येईल.

# ‘समृद्धी’वर कार पुलाला धडकली! दोघे ठार, तीन जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३बुलढाणा**

आज बुधवार, २३ एप्रिल रोजीची सकाळ समृद्धी महामार्गवरील भीषण अपघाताची बातमी घेऊन आली. या दुर्घटनेत दोन प्रवासी ठार तर तिघे जखमी झाले आहे. या घटनेचा तपशील प्राप्त झाला नाही.



प्राप्त प्राथमिक माहितीनुसार आज बुधवारी, २३ एप्रिल रोजी सकाळी संभाजीनगर कडून नागपूरच्या दिशेला जाणारी भरधाव कार समृद्धी वरील पुलाच्या कठड्याला धडकली. ही धडक इतकी भीषण होती की, कार चा अक्षरशः चुराडा झाला. शिवणी पिसा ते धानोरा या गावांच्या मधोमध समृद्धी महामार्गावर असलेल्या सीता नदीच्या पुलावर अपघात झाला.एका भरधाव गाडीने पुलाला धडक दिली. त्यामध्ये एकूण पाच प्रवासी होते. त्यातील दोन प्रवासी जागीच ठार झाले. तिघाना उपचारासाठी नजीकच्या शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान डोणगाव पोलिसांनी घटना स्थळी दाखल होत अपघात ग्रस्त वाहन बाजूला सरकावून समृद्धी वरील वाहतूक सुरळीत केली. जखमीची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आल्याचे सांगण्यात आले. केंद्रीय आरोग्य, आयुष, परिवार कल्याण मंत्री प्रतापराव जाधव यांनी शव विच्छेदन लवकर करण्याचे निर्देश आरोग्य यंत्रनांना दिले. शिवसेना (शिंदे गट) मेहकर शहर प्रमुख जयचंद बाठीया यानी ही माहिति दिली. अपघात ग्रस्तना सुमारे पाऊण तास कोणत्याही स्वरूपाची मदत मिळाली नसल्याचा आरोपही त्यांनी बोलून दाखविला.

# बुलढाण्यातील पाच पर्यटक दहशतवादी हल्ल्यातून थोडक्यात वाचले, हॉटेल मालकाच्या प्रसंगावधनामुळे वाचला जीव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३बुलढाणा**

दहशवादी हल्ल्याने काश्मीर हादरलं आहे. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येते आहे. जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथील बैसरन पर्वतावर फिरायला गेलेल्या पर्यटकांच्या गटावर दहशतवाद्यांकडून बेछूट गोळीबार करण्यात आला. या घटनेत २६ पर्यटकांचा मृत्यू झाला

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान, यात हॉटेल मालकाच्या सावधगिरीमुळे महाराष्ट्रातील बुलढाण्यातील पाच पर्यटकांचा जीव वाचला आहे. मंगळवारी काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला. या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. हॉटेल मालकाच्या प्रसंगावधनामुळे महाराष्ट्रातील पाच लोकांचा जीव वाचला आहे. यात सध्या बुलढाणा जिल्ह्यातील पाच जण पहलगाम मध्ये अडकले आहेत. मंगळवारी



पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. तेव्हा पाच जण तेथील हॉटेल मधेच होते. बुलढाण्यातले हे पाचजण हॉटेलबाहेर पडणार होते तेव्हाच हॉटेल मालकाने त्यांना थांबवले.त्यांना सांगितले की, गोळीबार सुरु झाला आहे.बाहेर फिरायला पडू नका.

**बुलढाण्यातलं जैन कुटुंब १८ एप्रिल रोजी फिरायला गेलं होतं**

बुलढाण्यातील पाच जण १८ तारखेला फिरायला जम्मू काश्मीर मध्ये गेले होते.यामध्ये तीन पुरुष व दोन महिला आहेत. अरुण जैन यांचे भाऊ व त्यांची पत्नी व तीन मुले असा समावेश आहेत. जेव्हा गोळीबार सुरु झाला तेव्हा बुलढाण्यातील कुटुंब तिथेच हॉटेलमध्ये होते. गोळीबाराच्या आवाजाने हे कुटुंब खूप घाबरलं होतं. सध्या हे जैन कुटुंब हॉटेलमध्येच आश्रयला आहे. एकूण पाच लोक आहेत. यामध्ये २ महिला , ३ पुरुषांचा समावेश आहे.काश्मीरमध्ये अडकलेल्या या पाच जणांची नावे निलेश जैन, पारस अरुण जैन, ऋषभ अरुण जैन, श्वेता निलेश जैन, अनुष्का निलेश जैन अशी आहेत. हे सगळेजण १८ एप्रिलला मुंबईहून काश्मीरला निघाले होते. जम्मू काश्मीर मधील सर्व ठिकाणी फिरुन झाल्यानंतर २१ तारखेला रात्री पहलगामच्या हॉटेलमध्ये आले. २२ तारखेला सकाळी पहलगामध्ये फिरायला निघणार तेवढ्यात हॉटेलच्या लोकांनी गोळीबार झाल्याचे व बाहेर न पडण्यास सांगितले. आता हे कुटुंब सुखरूप असल्याची माहिती मिळाली आहे.

# पहलगाम येथे हल्ल्यात थोडक्यात बचावलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांसोबत राणा दाम्पत्यांचा संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती**

दरवर्षी जम्मु काश्मिर परिसरामध्ये भारतातील हजारो पर्यटक सुट्ट्यांचा आनंद घेण्याकरिता जात असतात त्या अनुषंगाने यावर्षी सुद्धा संपुर्ण भारतातून हजारो पर्यटक सुट्टयांचा आनंद घेत असतांनाच पहलगाम येथे दहशतवाद्यांनी अचानकपणे भ्याड हल्ला केला यामध्ये २८ पर्यटकांचा मृत्यु झाला त्यामुळे इतर पर्यटक घाबरुन इतरत्र सैरावैरा पळुन आपला जिव वाचविला यामध्ये महाराष्ट्रातील विशेषत: अमरावती मधिल पर्यटक होते. अमरावती जिल्ह्यातील पर्यटक असल्याने एक नैतीक जबाबदारी म्हणून मा.खा.नवनित राणा व आ.रवि राणा यांनी ताबडतोब त्याठिकाणी असलेल्या युवा स्वाभिमान पार्टीच्या महिलाअध्यक्षा चंदाताई लांडे यांच्या सोबत तसेच इतर पर्यटकांशी फोनवरुन संवाद साधला तसेच त्याठिकाणची परिस्थीतीची माहिती घेतली तेव्हा सर्व पर्यटक घाबरले असल्याचे आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांच्या लक्षात आले यावेळी ताबडतोब आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांनी त्याठिकाणची पर्यटकाची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करुन अमरावती येथे येण्यासंदर्भात सुद्धा विशेष व्यवस्था केली. त्यामुळे सर्व पर्यटकांनी मा.खा.नवनित राणा व आ.रवि राणा यांनी केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन आभार व्यक्त केले.




# हरियाणातील पिजोर येथून वन विभागाकडे सुपूर्द

## मेळघाट, ताडोबा, पेंच प्रकल्पांत ३४ गिधाडे आणणार : मेळघाटमध्ये १५ गिधाडे सोडण्यात येणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३ मेळघाट**

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त, पिंजोर (हरियाणा) येथून २० लांब आणि १४ पांढ्या रंगाची गिधाडे महाराष्ट्र वन विभागाकडे सुपूर्द करण्यात आली आहे. पक्षी जटायू संवर्धन प्रजनन केंद्र पिंजोर येथून महाराष्ट्रातील मेळघाट, ताडोबा व पेंच येथे आणण्यात येणार आहे. यामध्ये ताडोबात प्रकल्पात पाच, पेंच येथे १४ तर मेळघाट प्रकल्पात १५ गिधाड आणली जाणार आहेत.



मेळघाट प्रकल्पामध्ये अकोट वन्यजीव विभागांतर्गत सोमठाणा रेंजच्या जंगलात ही गिधाडे सोडण्यात येणार आहे. भारतात गिधाडांच्या पुनर्प्रदर्शन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, एकूण ३४ बंदिस्त जातीची गिधाडे, यामध्ये २० लाँग-बिल आणि १४ पांढरे-गिधाड (जटायू) गिधाड संवर्धन प्रजनन केंद्र, पिजोर येथून महाराष्ट्रातील तीन प्रमुख स्थळांवर यशस्वीरित्या हस्तांतरित करण्यात आली आहेत. यामध्ये मेळघाट प्रकल्पात १५, पेंच येथे १४ आणि ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात ५ गिधाडांचा समावेश आहे. मंगळवार २२ एप्रिल रोजी करण्यात आलेले हे हस्तांतरण मध्य भारतातील गंभीरपणे धोक्यात असलेल्या गिधाडांच्या संख्येला पुनरुज्जीवित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यावेळी ही सर्व गिधाडे २ते ६ वर्षे वयोगटातील आहेत.

या सर्व गिधडांची सर्वसमावेशक आरोग्य तपासणीनंतर त्यांची तंदुरुस्ती बघूनच जंगलात सोडण्यासाठी निवड केली गेली आहे. पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी आणि जंगलात यशस्वी प्रजननासाठी केले आहे. प्रवासा दरम्यान तणाव कमी करण्यासाठी आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक बॉक्समध्ये एक पक्षी याप्रमाणे गिधाडांची वाहतूक वैयक्तिक लाकडी पेट्यांमध्ये करण्यात आली. वाहतुकीपूर्वी, पक्ष्यांना मानक प्रोटोकॉलनुसार दोन दिवसअगोदर शेवटचा आहार दिला गेला आहे. पक्षयांना तीन वातानुकूलित टेम्पो ट्रॅव्हलर्समध्ये आणण्याप्त आले. जेणेकरून संपूर्ण संक्रमणामध्ये तापमान आणि वायुवीजन चांगले राहावे. या टीमचे नेतृत्व ताडोबा प्रकल्पातील कोळसाचेवनपरिक्षेत्र अधिकारी रुंदन काटकर यांनी केले. त्यांना पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मयंक बर्डे, वरिष्ठ जीवशास्त्रज्ञ मनन महादेव, बॉम्बे नॅचरल हिस्टी सोसायटी आणि ताडोबा व पेंचच्या दोन वनरक्षकांची सोबत होती. हरियाणाचे मुख्य वन्यजीव वॉर्डन विवेक सक्सेना, मुख्य वन्यजीव संरक्षक श्रीनिवास राव आणि संचालक बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे संचालक किशोररिठेयांचेनिरीक्षण व मार्गदर्शनातहा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. गिधाडांचे संवर्धनासाठी ताडोबात क्षेत्र संचालक प्रभुनाथ शुल्का, पेंचचे क्षेत्र संचालक किशोर मानकर, मेळघाटचे आदर्श रेड्डी यांनी पक्षांच्या सुरक्षिततेची संपूर्ण व्यवस्था केलेली आहे.

# राज्यात चांदुर बाजार एपीएमसीने मारली बाजी : पहिल्या दहामध्ये विदर्भातील सहा बाजार समित्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती**

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यातील ३०५ बाजार समित्यांची आणि ६८ खासगी बाजारांची सन २०२३-२४ या वर्षाच्या कामगिरीवर आधारित वार्षिक क्रमवारी पणन संचालनालयाकडून जाहीर करण्यात आली आहे. या क्रमवारीनुसार राज्यातील पहिल्या १० मध्ये विदर्भातील सहा बाजार समित्यांनी स्थान मिळवले. हिगणघाट प्रथम, कारंजा लाड द्वितीय, चांदुर बाजार पाचव्या, तर अकोला बाजार समितीने सहावे स्थान प्राप्त केले.



बाजार समित्यांची तसेच खाजगी बाजारांची क्रमवारी निश्चित करण्यासाठी पणन संचालनालयाकडून जागतिक बँकेच्या सुचनेनुसार शेतमालाच्या विक्री व्यवस्थेसाठी बाजार समितीत असलेल्या पायाभूत व इतर सुविधा, आर्थिक व वैधानिक कामकाज, योजना, उपक्रम राबविण्यातील सहभाग यानुसार ३५ निकष तयार करण्यात आले होते. बाजार समित्यांच्या निकषासाठी २०० गुण व खाजगी बाजारांसाठी २५० गुण निश्चित करण्यात आले होते. बाजार समित्यांच्या वार्षिक क्रमवारीनुसार राज्यात पहिल्या १० बाजार समित्यांमध्ये वर्धा जिल्ह्यातील हिगणघाट बाजार समिती १७८ गुण मिळवून पहिल्या क्रमांकावर, वाशीम जिल्ह्यातील कारंजा लाड बाजार समिती १७१.५ गुणांसह दुसऱ्या स्थानी, अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार १५५.५ गुणांसह पाचव्या स्थानी, १५४.५ गुणासह अकोला सहाव्या स्थानी, नागपूर जिल्ह्यातील उमरेड १५२.५ सातव्या तर १४९ गुण मिळवून वाशीम जिल्ह्यातील मंगरुळपीर आठव्या स्थानावर आहे.

तसेच राज्यातील सहकार विभागाच्या रचनेनुसार अमरावती विभागात कारंजा लाड प्रथम, चांदूर बाजार द्वितीय, तर अकोला तिसऱ्या स्थानावर आहे. नागपूर विभागात हिगणघाट प्रथम, उमरेड द्वितीय व गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तिसऱ्या स्थानावर आहे. या क्रमवारीमुळे विदर्भातील बाजार समित्यांच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब झाले. खासगी बाजार समित्यांमध्ये राज्यातील पहिल्या पाचमध्ये यवतमाळ येथील कॉटनसिटी अग्रो फुड्स प्रथम, तर यवतमाळ जिल्ह्यातीलच शेलू बु. येथील किसान मार्केट यार्ड बाजार समितीने द्वितीय स्थान पटकावले.

# भोपाळ जवळ GAIL प्लांटमध्ये मिथेन गॅस गळती; परिसरात भीतीचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३भोपाळ**

भोपाळपासून सुमारे ३५ किमी अंतरावर असलेल्या रायसेन येथील मंडीदीप औद्योगिक क्षेत्रातील गॅस अर्थॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड प्लांटमधून मिथेन वायूची गळती झाली. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने, गॅस गळती वेळेत आटोक्यात आली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.



अधिकाऱ्यांनी सांगितले की, खबरदारीचा उपाय म्हणून, जवळच्या औद्योगिक युनिट्समधील उत्पादन तात्पुरते बंद करण्यात आले आणि रस्ते वाहतूक देखील थांबवण्यात आली आहे.

एजन्सीच्या माहितीनुसार, ही घटना पहाटे २ च्या सुमारास घडली. मिथेन हा अत्यंत ज्वलनशील, रंगहीन आणि गंधहीन वायू आहे, जो आग लागल्यास गंभीर धोका निर्माण करू शकतो. गळतीची तक्रार येताच प्रशासनाने तातडीने कारवाई केली आणि प्लांटच्या २०० मीटर परिसरातील सर्व युनिट्सचे कामकाज बंद केले आणि रस्ता देखील बंद करण्यात आला.वायू हवेत पसरला, या घटनेत कोणत्याही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. सध्या, प्लांटमधील उत्पादन काम थांबवण्यात आले आहे आणि सुरक्षा उपायांचा आढावा घेतला जात आहे. रात्रभर घटनास्थळी प्रशासकीय अधिकारी आणि तज्ज्ञ तैनात करण्यात आले आहेत आणि प्लांटची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी व्यापक पावले उचलली जात आहेत.

# धर्म विचारून गोळ्या घालणारे मुसलमान होऊ शकत नाहीत असे कृत्य करणाऱ्यांना इस्लाममधून काढले जाईल : अबू आझमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई**

जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी मंगळवारी हल्ला केला. या हल्ल्यात आत्तापर्यंत २७ जणांचा मृत्यू झाला आहे. पुलवामा हल्ल्यानंतरचा हा सर्वात मोठा हल्ला समजला जात आहे. या हल्ल्यात अनेक पर्यटन गंभीर जखमी झाले आहेत. या भीषण हल्ल्यामुळे जम्मू काश्मीरसह संपूर्ण देशात हळहळ व्यक्त केली जात आहे. या हल्ल्यात महाराष्ट्रातील ६ जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, दहशतवादी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून त्यांची हत्या करत असल्याची माहिती समोर आली आहे. यावर समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



धर्म विचारून जर गोळ्या घातल्या असतील तर ते खरे मुसलमान होऊ शकत नाहीत, असे अबू आझमी म्हणाले आहेत. धर्माच्या नावावर अशा प्रकारचे कृत्य करणारे लोक इस्लामला मानणारे असू शकत नाहीत. अशाच प्रकारची कृत्य करत राहिले तर त्यांना इस्लाममधून काढले जाईल, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.पुढे बोलताना अबू आझमी म्हणाले, सरकारने जर जम्मू काश्मीरमध्ये एवढी सुरक्षा व्यवस्था तैनात केली असेल तर मग हल्ला कसा झाला? याची जबाबदारीही सरकारने घ्यायला हवी. आता अमरनाथ यात्रेला सुरुवात होणार आहे, त्याचवेळी हा हल्ला झाला. तिथे जाणाऱ्या लोकांची जबाबदारी ही सरकारची आहे, असेही ते म्हणाले आहेत.दरम्यान, राजधानी दिल्लीत आता हालचालींना वेग आल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे या हल्ल्याचे भारत दहशतवाद्यांना सडेतोड उत्तर देणार असे निश्चितच झाले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देखील हा हल्ला करणाऱ्यांना सोडले जाणार नाही, असे म्हटले आहे. देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सीडीएस आणि तिन्ही सैन्यदल प्रमुखांची बैठक घेतली आहे. यावेळी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल देखील उपस्थित होते. ही बैठक जवळपास साडे तीन तास सुरू होती. बैठकीत सैन्यदलांच्या तिन्ही प्रमुखांनी पाकविरोधी कारवायांचे पर्याय राजनाथ सिंहांसमोर ठेवले. आता हे तीनही पर्याय संध्याकाळी होणाऱ्या सीसीएसच्या बैठकीत पंतप्रधान मोदींसमोर मांडण्यात येणार आहेत.

# जम्मू मध्ये अडकलेल्या पर्यटकांना विशेष विमानाने आणणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई**

जम्मू-काश्मिरच्या पहलगाम येथे मंगळवारी दुपारी ४ दहशतवाद्यांनी बेछूट गोळीबार केला. या गोळीबारामध्ये २७ पर्यटकांचा मृत्यू झाला. या मृत पर्यटकांमध्ये ६ पर्यटक हे महाराष्ट्रातील आहेत. महाराष्ट्रातील या मृत पर्यटकांच्या कुटुंबीयांना सरकारने ५ लाखांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. याचसोबत जम्मू-काश्मीर सरकारने देखील २७ मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाखांची मदत जाहीर केली आहे.

महाराष्ट्र सरकारने पहलगाम हल्ल्यातील मृतांना मदत जाहीर केली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीट देखील केले आहे. 'पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यात प्राण गमवावे लागलेल्या महाराष्ट्रातील एकूण ६ जणांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत राज्य सरकारने जाहीर केली आहे. तर, जखमींना ५०,००० रुपयांची मदत जाहीर केली आहे. महाराष्ट्रातील अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्यासाठी एक विशेष विमान वापरण्यात येणार आहे आणि त्याचा खर्च राज्य सरकारतर्फे करण्यात येईल.’, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

तर, जम्मू आणि काश्मीर सरकारने पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालेल्या २७ जणांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे . तर जखमींना २ लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. श्रीनगरमध्ये गृहमंत्री अमित शहा आणि उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहिली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतदेह कुटुंबियांसह विमानतळावर पाठवले जाणार आहेत. त्यानंतर त्यांना विमानाने त्यांच्या घरी नेले जाईल.